# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०१९
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकोणिसावे
अंक आठवा

## बहुरंगी देशाचा तिरंगी अभिमान...





**ज्येष्ठ लेखिका आणि अनुवादक उमा कुलकर्णी** यांना त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल नुकताच **'एबीपी माझा कृतज्ञता पुरस्कार २०१८' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते **पुरस्कार स्वीकारताना उमा कुलकर्णी.** (सविस्तर वृत्त पान १७ वर)




**आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट** यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. **'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास'** या ग्रंथासाठीचा पुरस्कार **अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे** यांच्या हस्ते स्वीकारताना **अप्पासाहेब जकाते-यादव आणि डॉ. कीर्ती मुळीक.** (सविस्तर वृत्त पान १७वर)

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक सातवा



**संपादक**
सुनील मेहता

**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


**– अनुक्रमणिका –**


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **दिनविशेष** | १० |
| **चर्चेतील पुस्तक** | १४ |
| **पुरस्कार** | १७ |
| **उपक्रम** | १८ |
| **प्रकाशन वार्ता** | १८ |
| **श्रद्धांजली** | १९ |
| **पुस्तक परिचय** | |
| मायक्रो | २० |
| माय नेम इज परवाना | २८ |
| स्वर्गाचा साक्षात्कार | ३६ |
| अशक्य भौतिकी | ४२ |
| घणघणतो घंटानाद | ५२ |
| **अभिप्राय** | |
| आयडिया मॅन | ६० |
| पाचूचे बेट | ६० |
| गोष्ट डॉट कॉम | ६१ |
| फिश! | ६२ |
| **बालनगरी** | ६३ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## फुलोरा आशय-चित्रांचा

आषाढसरी मुक्तपणे बरसून गेलेल्या असतात आणि मग बहरलेल्या निसर्गाच्या साक्षीने श्रावण येतो, ऊन-पावसाचा लपंडाव खेळायला. अशा या प्रसन्न वातावरणात मनाचा फुलोरा फुललेला असतो आणि मग मन शोधायला लागतं पुस्तकांमधला फुलोरा...म्हणजे मनाला प्रसन्न करणारी...सकारात्मकता देणारी शब्दकळा आणि रंगरेषांची किमया.

'मृद्‌गंध'...इंदिरा संतांच्या या पुस्तकाच्या शीर्षकानेच मातीचा गंध दरवळायला लागतो मनात. या पुस्तकातील 'गंधगाभारा' या लेखात त्या लिहितात, 'इतक्यात आभाळ काळेभोर होते आणि विजेप्रमाणे साट-साट पावसाचे मोठ-मोठे थेंब सपकारायला लागतात. या वेळी नाचण्याशिवाय दुसरे काय करणार? आणि काळ्याभोर मातीतून उठलेला तो वाफाळा... आणि वास. घम्... घम्... घम्... किती-किती घ्यावा! शेवटी मी एक मोठा ढेकळा उचलून नाकाशी धरते. सरकत्या रंगमंचावरील एकदा अनुभवलेला आणि पुन्हा अनुभवत असलेला हा वास पहिल्या पावसाचा. मातीचा हाच खरा मृद्‌गंध. या गंधात स्मृतीचे, रागानुरागांचे कोणतेच तरंग नसतात. तो असतो, फक्त मृद्‌गंध. एखाद्या विशुद्ध भावकवितेसारखा. हा उत्सव चार-दोन क्षणच लुटता येतो; पण त्यासाठी जी वाट पाहिली, ती धन्य होते. नाहीतरी कोणतेही अतीव सुख क्षणातच मोजायचे असते ना?' इंदिराबाईंनी या लेखात विविध गंधांबद्दल इतकं लालित्यपूर्ण निवेदन केलं आहे, की तो तो गंध आपल्याही मनाला स्पर्शून जातो. तर अगणित शब्दांतून फुललेला हा भावफुलोरा एका मुखपृष्ठातून व्यक्त करणं, हे तसं अवघड काम असतं; पण आर्टिस्ट तरीही त्या भावभावना रंगरेषांच्या माध्यमातून सौंदर्यपूर्णतेने व्यक्त करतात. 'मृद्‌गंध'चं मुखपृष्ठही असंच मोहक आहे. खरं तर 'गंध' ही घ्राणेंद्रियाला जाणवणारी आणि नंतर मनापर्यंत पोचणारी संवेदना. ती

चित्रांतून व्यक्त करणं अवघड होतं; पण पद्मा सहस्रबुद्धे यांनी हे काम चोख पार पाडलं आहे. वास्तविक, पाऊस पडल्यानंतर माती उडत नाही; पण तिच्यातून गंध उसळतो. तो उसळलेला गंध आणि आजूबाजूचा निसर्ग याचं नेमकं चित्र पद्मा यांनी रेखाटलं आहे.

काही वेळेला निसर्ग अशीच प्रसन्न झुळूक घेऊन येतो. 'जंगलातील दिवस' या पुस्तकात व्यंकटेश माडगूळकरांनीही दोन-चार ओळींत असंच एक निसर्गचित्र टिपलं आहे. ते लिहितात,'सकाळी जागा झालो, तेव्हा पाखरं मंजूळ गात होती. वरच्या मजल्यावर असलेल्या झोपायच्या खोलीतून उठून मी गॅलरीत येऊन उभा राहिलो. माठातल्या, वाळ्याचा वास असलेल्या पाण्यासारखी हवा सुखद, थंड आणि सुगंधित होती. अजून पुरतं उजाडलं नव्हतं. समोर तलावावर विरळ धुकं तरंगत होतं. दहिवरानं ओली झालेली बागेतली उंच उंच झाडं अजून स्तब्ध उभी होती. हिरवळीच्या पट्ट्यांचे काठ निळ्या-पांढऱ्या, पिवळ्या-तांबड्या फुलांनी लखलखत होते.' पक्ष्यांची किलबिल, हवेतला सुगंध, झाडांवर पडलेलं दव आणि समोर फुलांचे ताटवे...माडगूळकरांनी केलेलं हे वर्णन मनावर सुखद शिडकावा करून जातं. नागझिऱ्याच्या जंगलात व्यंकटेश माडगूळकरांनी काही दिवस वास्तव्य केलं होतं, त्यावेळचं हे वर्णन आहे. या पुस्तकात जंगलातील प्राणी-पक्षी जीवन माडगूळकरांनी प्राधान्याने टिपलं आहे, त्याची झलक या पुस्तकाच्या मुखपृष्ठातून दिसते. जंगलाची व्यापकता आणि त्या पार्श्वभूमीवरील प्राणी-पक्ष्यांचं प्रातिनिधिक चित्र पुस्तकातील आशयाला नक्कीच उठाव देणारं आहे. हे चित्र रेखाटलं आहे चंद्रमोहन कुलकर्णी यांनी.

केवळ निसर्गाचं सौंदर्य टिपायचं म्हणून प्रत्येक वेळेला लेखक/कवी निसर्गाचं वर्णन करत नाहीत, तर ती एक भावस्थिती असते. काही वेळेला एखाद्या व्यक्तीचं वर्णन करतानाही अलगदपणे त्या वर्णनातून निसर्ग डोकावतो. ध्रुव भट्ट लिखित आणि अंजनी नरवणे अनुवादित 'सागरतीरी' या कादंबरीत एका लहानग्या कृषिकन्येचं वर्णन केलं आहे, ते असं, 'तिचं, तिचं स्वतःचं, तिचा खास अधिकार असलेलं तिचं जग अन् त्या जगाची ती मालकीण. कोणाची भीड, भीती नसलेली, मुक्त, निर्बंध, खुल्या नभाखाली, या सदाच निर्बंध असलेल्या अथांग समुद्राच्या सहवासात वाढणारी, नारळींच्या पानांवर

पसरणाऱ्या या चांदण्यासारखी, झुळझुळ वाहणाऱ्या या वाऱ्यासारखी ही मुक्त बालिका?’ शहरातून आलेल्या नायकाला या मुलीचं खुलेपण भावलंय. तिचा हा स्व-भाव तिच्या अवतीभवतीच्या निसर्गामुळेच मिळालाय तिला, असं त्या नायकाला वाटतं. तर शहरातून काहीशा नकारात्मक भावनेने समुद्राकाठच्या एका खेड्यात आलेला हा नायक सागराच्या सान्निध्यात राहणाऱ्या माणसांच्या मनाचं मोठेपण अनुभवतो. जीवनाच्या व्यापकतेची अनुभूती घेतो. अथांग सागर ही या संपूर्ण कादंबरीला व्यापून उरणारी प्रतिमा आहे. म्हणून मुखपृष्ठावरही निळाशार, अथांग समुद्र दिसतो, जो बरंच काही सूचित करतो. हे मुखपृष्ठ ही मेहता पब्लिशिंग हाऊसची निर्मिती आहे.

उपरोल्लेखित तीनही पुस्तकं माणूस आणि निसर्ग यांच्यातील अनुबंधाचं मनोज्ञ दर्शन घडविणारी आणि जीवनापलीकडची अनुभूती देणारी आहेत. निसर्ग आणि माणसाच्या भावभावनांचं एकत्व ‘मृद्‌गंध’ आणि ‘सागरतीरी’मधून प्रतीत होतं आणि ‘जंगलातील दिवस’मधून प्राणी-पक्षी यांचं अनोखं विश्व माडगूळकरांच्या सहज शैलीतून प्रकटत जातं.

तर असा हा पुस्तकांचा फुलोरा मनाला सुखावणारा, खूप काही शिकवणारा आणि सौंदर्यानुभूती देणारा!



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

### सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

### बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
ैंस्त : सीर्ूदिदवेत्तुैंस्त.म्दस

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी इँददे युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.in

play.google.com

eBooks



Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०१९ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

### १७ ऑगस्ट - सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन

'हाच माझा मार्ग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३४९/-**

### १८ ऑगस्ट - गुलज़ार यांचा जन्मदिन

'त्रिवेणी', 'रावीपार', 'गुलज़ार पटकथा', 'धागे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८६५/- । सवलत किंमत ११४९/-**

### १९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन

'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'अस्तित्व', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'डॉलर बहू', 'गोष्टी माणसांच्या', 'महाश्वेता', 'परीघ', 'पितृऋण', 'सुकेशिनी आणि इतर कथा', 'थैलीभर गोष्टी', 'वाइज अँड अदरवाइज', 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...', 'पुण्यभूमी भारत', 'सामान्यांतले असामान्य', 'सर्पाचा सूड', 'गरुडजन्माची कथा', 'तीन हजार टाके', 'त्रिशंकू' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३१३०/- । सवलत किंमत २०४९/-**

### १९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन

'चिकन सूप' मालिकेतील ४३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८६७५/- । सवलत किंमत ५१४९/-**

### २० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य', 'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२५/- । सवलत किंमत २७९/-**

**२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन**

'ब्लॅक लिस्ट', 'फुल ब्लॅक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ५९९/-**

**२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन**

'मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स', 'टिअर्स ऑफ द जिराफ', 'द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी', 'द फुल कबर्ड ऑफ लाइफ' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ४४९/-**

---

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन**

'लज्जा', 'फेरा', 'निर्बाचित कलाम', 'नष्ट मेयेर नष्ट गद्य', 'निर्बाचित कबिता', 'आमार मेयेबेला', 'उधाण वारा', 'फरासि प्रेमिक', 'द्विखंडित' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २३३०/- । सवलत किंमत १४४९/-**

---

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फॉर्साइथ यांचा जन्मदिन**

'नो कम बॅक्स', 'द अफगाण', 'द फिस्ट ऑफ गॉड', 'मध्यस्थ', 'द ओडेसा फाइल' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८७५/- । सवलत किंमत ११४९/-**

---

**२७ ऑगस्ट - मदर तेरेसा यांचा जन्मदिन**

'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'मदर टेरेसा:प्रतिमेच्या पलीकडे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन**

'माय स्टोरी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३१९/-**

---

**३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन**

'मृत्युंजय' (नाटक), 'छावा' (नाटक), 'मोरावळा', 'कांचनकण', 'शेलका साज', 'अशी मने असे नमुने', 'कवडसे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११०५/- । सवलत किंमत ६९९/-**

**खालील संचावर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन**

'नाना आणि महादजी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन**

'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन**

'टू सर, विथ लव्ह', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११४०/- । सवलत किंमत ६४९/-**

**१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन**

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६७५/- । सवलत किंमत ३९९/-**

**१५ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन**

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५००/- । सवलत किंमत ३४९/-**

◆

**वरील किंमतीत बदलाची शक्यता**

**❖ अधिक माहितीसाठी संपर्क ❖**


फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
Whats App No. : ९४२०५९४६६५
website : www.mehtapublishinghouse.com

## सर्वच ‘चवी’ जिभेवर रेंगाळत ठेवणारी,
## साऱ्या कुटुंबाची हवीहवीशी सखी

# रुचिरा


**कमलाबाई ओगले**

**५२वी आवृत्ती**




**भाग - १**
**किंमत २२५/- रु.**

**२३वी आवृत्ती**




**भाग - २**
**किंमत २७५/- रु.**

**एकत्रित पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**५वी आवृत्ती**

# परीघ




लेखिका : **सुधा मूर्ती** | अनुवाद : **उमा वि. कुलकर्णी**

‘जर तू विशीत आदर्शवादी नसशील,
तर तुला हृदय नाही असं समज;
आणि जर तू चाळिशीच्या नंतरही आदर्शवादीच राहिलास,
तर तुला अक्कल नाही असं समज!’

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# चौघीजणी

**लेखिका : लुइसा मे अल्कॉट अनुवाद : शान्ता शेळके**

आपल्या आयुष्यात, आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींमध्ये एखादी विशेष गोष्ट घडली की चर्चा होते, बातमी येते, त्याचप्रमाणे पुस्तकांच्या दुनियेतही असंच काहीतरी घडतं. एखादं पुस्तक कोणी वाचलं आणि त्याला ते फार आवडलं तर ती व्यक्ती त्या पुस्तकाबद्दल इतरांना सांगते, त्यावर चर्चा होते. त्यातून इतरांना वाचण्याची प्रेरणा मिळते. अशाच अनेक चर्चांमध्ये गाजलेलं एक पुस्तक म्हणजे, शान्ता शेळके यांनी अनुवादित केलेलं 'चौघीजणी.'

लुइसा मे अल्कॉट या मूळ अमेरिकन लेखिकेने १८६८ मध्ये लिहिलेल्या 'लिटल वुमन' या पुस्तकाचा शान्ता शेळके यांनी बरोबर १०० वर्षांनी म्हणजेच १९६८मध्ये 'चौघीजणी' या नावाने मराठी अनुवाद केला. 'लिटल वुमन' हे पुस्तक गेली १५० वर्षं देशोदेशीच्या तरुण मुलामुलींचं अत्यंत आवडीचं पुस्तक ठरलं आहे. हॉलीवूडने या पुस्तकावर दोन वेळा चित्रपटही काढला आहे. मेग, ज्यो, बेथ आणि एनी ह्या चार बहिणी. वडील युद्धावर, आई खालावलेल्या सांपत्तिक स्थितीत देखील मुलींना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देत असते. चार मुलींच्या चार वाटा; पण गरिबीतही परवडेल ती मौजमजा करणे, आईला मदत करणे, सामाजिक बांधिलकी निभावणे इ. गोष्टी चोखपणे पार पाडणाऱ्या मुलींना, शेजारचे आजोबा आणि त्यांचा नातू हे मित्र आणि हितचिंतक म्हणून लाभतात...शेवटी सर्वजणी माफक संघर्ष करून जीवनाचा मार्ग शोधतात. खूप भव्य-दिव्य काही नसलं तरी सामान्य व्यक्तींच्या जीवनाचं, नात्यातील गोडव्याचं, छोट्या छोट्या होणाऱ्या कुरबुरी आणि त्यांचं निरसन करणाऱ्या या सर्व गोष्टींचं फार लोभस चित्रण केलं आहे या पुस्तकात.




**मनाली बल्लाळ** लिहितात 'चौघीजणी' ही कादंबरी ज्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद आहे, ती 'लिटल वुमन' कादंबरी इंग्रजी साहित्यात अभिजात गणली जाते. खपाच्या बाजूने ती अजूनही पहिल्या पाचांत आहे. कथा, भाषा, मूल्य, मनोरंजन या वर्ण्य पुस्तकाच्या जमेच्या बाजू आहेत आणि जगभरच्या वाचकांना भावलेला विषय म्हणजे आनंदाचा ठेवा. विशेषत: युवा पिढीने हे पुस्तक वाचायलाच हवं. **सुमती कुंभार** या पुस्तकाचा एकंदरीत सारांश सांगतात की, गरीब घरात वाढलेल्या असल्या तरी छोट्या छोट्या गोष्टींतून आनंद वेचणाऱ्या चार बहिणींचं हे कुटुंब आहे. प्रत्येक बहिणीचा स्वभाव वेगळा असला तरीही एकमेकींशी त्यांचं घट्ट नातं आहे. त्यामुळे अतूट नातेसंबंधावर आधारित हे पुस्तक खूप सुंदर आहे. **धनश्री साळुंखे** लिहितात, 'अप्रतिम अनुवाद. वाचताना प्रत्येक घटनेचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं. कथेची मांडणी खूप सुंदर आहे. प्रत्येकाला वाचायला सांगावं असं, भेट म्हणून द्यावंसं वाटणारं, वाचताना एखादा प्रसंग आपलाच आहे, असं वाटायला लावणारं कथानक असलेलं आणि नकळत आत्मपरीक्षण करायला लावणारं असं हे अभिजात पुस्तक आहे.'

**कल्पना ठाकूर** युवकांच्या दृष्टिकोनातून या पुस्तकाकडे बघतात. त्या लिहितात, 'ही अतिशय सुंदर कथा आहे. मी ती अनेकदा वाचली आहे. विशेष म्हणजे किशोर अवस्थेतील मुलामुलींनी हे पुस्तक नक्की वाचावं. मी ज्या वयात ही कथा वाचली त्या युवावस्थेत ती माझ्या मनाला भावली.' **सतीश गोरे** म्हणतात, 'श्रीमती शान्ता शेळकेंनी खूप छान अनुवाद केला आहे या पुस्तकाचा. 'चौघीजणीं'चं भावविश्व अतिशय हळुवारपणे उलगडून दाखवलं आहे. मी हे पुस्तक वाचून नऊ -दहा वर्षं झाली तरीही आता पुन्हा वाचावंसं वाटतं आहे. ५७४पानी पुस्तक वाचल्यानंतर एक अप्रतिम पुस्तक वाचायचं राहून गेलं नाही, या गोष्टीचं खूप समाधान लाभेल. पाचपन्नास पानं वाचल्यावर तुम्ही हे पुस्तक शेवटपर्यंत वाचल्याशिवाय खाली ठेवणार नाही, असं वाटतं.' **चित्रा नानिवडेकर** म्हणतात, 'सुंदर भाषा, टॉम बॉयसारख्या एका मुलीचं वर्णन आणि गरिबीतसुद्धा एकमेकींना धरून राहणाऱ्या बहिणी...नक्की वाचा.'

पुस्तकातील गोष्टी, मनात रुंजी घालणारे प्रसंग हे सर्व वाचकांच्या मनात घर करतात. त्यामुळे अनेक वाचक पुन्हा पुन्हा ही कथा वाचायला प्रेरित होतात. **माधवी देशपांडे** म्हणतात, 'हल्लीच्या स्पर्धेच्या युगात आपण हा साधेपणाच हरवत चाललो आहोत. म्हणून मला ह्या पुस्तकाची अपूर्वाई वाटते.' **समता नांदोसकर** लिहितात, 'मी खूप वर्षांपूर्वी हे पुस्तक वाचलं होतं. १८६८मधील ब्रिटन, युरोपमधील स्थित्यंतराचा काळ, त्याचा कुटुंबव्यवस्थेवर, नातेसंबंधावर, व्यक्तीच्या भावविश्वावर होणारा परिणाम, वेगवेगळ्या क्लासमधील गरीब- श्रीमंत लोकांच्या जीवनशैलीचं दर्शन आपल्याला होतं. आपल्याकडे हा सामाजिक बदल शंभर-सव्वाशे वर्षांनंतर दिसतोय. **आदिती आगरकर** शान्ता शेळकेंच्या लेखनाला अभिवादन करत म्हणतात, 'अरे! खूप सुंदर कादंबरी. शान्ता शेळकेंनी किती बारीक निरीक्षण केलं आहे. मी तर अनेकवेळा वाचली आहे. अप्रतिम. 'वाचाल तर वाचाल.' वाचाच. स्त्रीमनाच्या कुपीत दडलेलं रहस्य उलगडलंय अलगदपणे..,' **प्राजक्ता भागवत** म्हणतात, 'आई, मुली, बहिणी यांच्या नात्यातील भावबंध खूप सुंदर पद्धतीने बांधले आहेत. आतासुद्धा कधीही कोणतंही पान उलटून वाचलं तरी छान वाटतं.'

'चौघीजणी' या पुस्तकाची लोकप्रियता आणि कथा अनेक वाचकांना एका दिवसांत हे पुस्तक वाचावयास भाग पाडते. चर्चेत गाजलेल्या या पुस्तकावर मिळालेल्या वाचकांच्या प्रतिक्रियांमुळे इतर अनेक वाचकांनी हे पुस्तक वाचायलाही घेतलंय, हेच या पुस्तकाचं यश आहे.

**-देवयानी खरे**


**निमित्ता निमित्ताने...**

**२री आवृत्ती**

प्रास्ताविक : **सोनिया गांधी** | अनुवाद : **शान्ता ज. शेळके**

प्रत्येक भारतीयाला नागरी कर्तव्याची
जाणीव करून देणारे राजीव गांधी याचे चिंतनशील विचार

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**


# पुरस्कार

## उमा कुलकर्णी यांना ‘एबीपी माझा कृतज्ञता पुरस्कार’ प्रदान



ज्येष्ठ लेखिका आणि अनुवादक उमा कुलकर्णी यांना त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल नुकताच ‘एबीपी माझा कृतज्ञता पुरस्कार २०१८’ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मानचिन्ह आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. मुंबईत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर आणि विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर या वेळी उपस्थित होते. माणूस म्हणून आपले आयुष्य समृद्ध करणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांविषयीची कृतज्ञता समाजाच्या वतीने व्यक्त करणे, हा या पुरस्कारामागचा उद्देश असल्याचं राजीव खांडेकर यांनी सांगितलं.

## ‘डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास’ला आपटे वाचन मंदिराचा पुरस्कार



आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा सन २०१८ या वर्षातील उत्कृष्ट गद्य साहित्यकृती पुरस्कार डॉ. कीर्ती मुळीक आणि अप्पासाहेब जकाते-यादव यांनी संपादित केलेल्या ‘डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास’ या ग्रंथास प्राप्त झाला. हा ग्रंथ मेहता पब्लिशिंग हाऊस यांनी प्रकाशित केला आहे.

१३ जुलै या इंदिरा संत यांच्या स्मृतिदिनी हा पुरस्कार सोहळा इचलकरंजी येथील ग्रंथालयाच्या बजाज सभागृहात पार पडला. विविध साहित्य प्रकारांतील कलाकृतींना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष सदानंद मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## उपक्रम

### अभिवाचनातून उलगडले समीक्षेचे अंतरंग

समीक्षा ही सर्वसामान्य वाचकासाठी नसते, असा एक समज आहे. या समजाला छेद देत मेहता पब्लिशिंग हाऊसने 'उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी' या पुस्तकाच्या अभिवाचनाचं आयोजन केलं होतं. सुरुवातीला 'उपयोजित समीक्षा...' या पुस्तकातील 'श्री. विजय तेंडुलकर यांचे 'शांतता, कोर्ट चालू आहे' : मानसशास्त्रीय अवलोकन' या लेखाचं अभिवाचन करण्यात आलं. ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. अरविंद वामन कुळकर्णी यांचे सुपुत्र आणि अभिनेते अभय कुळकर्णी यांनी हे अभिवाचन केलं. त्याचबरोबर त्यांनी 'शांतता...'च्या काही भागाचंही अभिवाचन केलं. त्यांच्या या अभिवाचनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. या अभिवाचनाबरोबरच या नाटकातील काही भागाचं सादरीकरणही करण्यात आलं. या सादरीकरणाचं दिग्दर्शन गिरीश परदेशी यांनी केलं होतं. आदिश्री बडोदकट, तेजस इंदापूरकर या कलाकारांनी या सादरीकरणात भाग घेतला होता. पडद्यामागील जबाबदारी गणेश पांचाळ आणि विशाल बावने यांनी सांभाळली. आदिश्री बडोदकट यांनी ''आहे मनोहर तरी'' बरोबरच ''गमते उदास ही'' या लेखाचं अभिवाचन केलं.


एकूणच, मूळ साहित्यकृती आणि त्याचबरोबर तिच्या समीक्षेचा लाभ, हा दुर्मिळ योग मेहता पब्लिशिंग हाऊसने जुळवून आणला. मूळ साहित्यकृतीचं आकलन आणि त्यातील सौंदर्यस्थळांचं दर्शन हे समीक्षात्मक लेखनाचं योगदान आहे, ही बाब या कार्यक्रमाच्या निमित्ताने अधोरेखित झाली.

## प्रकाशन वार्ता

पुणे – मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दोन पुस्तकांचं नुकतंच प्रकाशन करण्यात आलं. डॉ. अतुल गवांदे लिखित आणि सुनीति काणे अनुवादित 'बेटर' आणि टॉड बर्पो, लीन व्हिन्सेन्ट लिखित आणि मेधा मराठे अनुवादित 'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकांचा प्रकाशन समारंभ एस. पी. कॉलेजमध्ये पार पडला. ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. संजय देवधर यांच्या हस्ते या पुस्तकांचं प्रकाशन करण्यात आलं. या वेळी सुनीति काणे, मेधा मराठे, एस. पी. कॉलेजचे प्राचार्य दिलीप शेठ, एस. पी. कॉलेजच्या मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अरविंद काकुळते उपस्थित होते.

◆

**अविनाश भोमे**



पुणे : ज्येष्ठ लेखक आणि अनुवादक अविनाश भोमे यांचं नुकतंच निधन झालं. पुण्याच्या बी.एम.सी.सी. कॉलेजमधून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलं. १९७०मध्ये बी.कॉम.च्या परीक्षेत ते सहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल त्यांना पुढील शिक्षणासाठी नॅशनल स्कॉलरशिपही मिळाली होती; परंतु कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांनी 'बँक ऑफ इंडिया'मध्ये नोकरी करण्यास सुरुवात केली. 'सकाळ', 'तरुण भारत' यांसारख्या मराठी, तसेच इतर प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर त्यांनी स्तंभलेखन, तसेच पत्रलेखन केले. व्यवस्थापन, अकाउंट्स, बँकिंग अँड फायनान्स यांसारख्या विषयांवर व्याख्याने देण्यासाठी त्यांना बँकांची ट्रेनिंग कॉलेजेस व विविध मॅनेजमेंट इन्स्टिटय़ूट्समधून आमंत्रित केले जाई. बालसंगोपनाबद्दल पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी ते 'तुम्ही अन् तुमची मुले' या विषयावर विविध शाळांमधून मोफत व्याख्याने देत असत. विडंबन गीतांचा कार्यक्रमही ते सादर करत असत. त्यांचे 'सुसंवाद सहकाऱ्यांशी' हे पुस्तक प्रसिद्ध असून, त्यात व्यंगचित्रांच्या साहाय्याने 'मॅनेजमेंट अँड ह्यूमन रिलेशन' हा अवघड व गुंतागुंतीचा विषय सोप्या पद्धतीने विशद करण्यात आला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊससाठी त्यांनी व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्या 'यू सेड इट!' या व्यंगचित्रसंग्रह मालिकेचं भाषांतर ('कसं बोललात!' (भाग १ ते ७) केलं. 'तुम्ही अन् तुमची मुलं' हे त्यांचं रूपांतरित पुस्तकही मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलं आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्सच्या वतीने अविनाश भोमे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

# पुस्तक परिचय



# मायक्रो




विज्ञानावर आधारलेल्या थरारक व रहस्यमय कथानकांनी वाचकांना खिळवून टाकणाऱ्या **मायकेल क्रायटन** यांना अफाट लोकप्रियता लाभली. त्यांची वीस कोटींपेक्षा जास्त पुस्तके खपली असून त्यांच्या पुस्तकांचे जगभरात ३६ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यांच्या १३ पुस्तकांवर चित्रपट निघाले आहेत. त्यांच्या द ॲन्ड्रोमिडा स्ट्रेन, ज्युरासिक पार्क, नेक्स्ट इ. कादंबऱ्यांनी लोकप्रियतेचे विक्रम मोडले आहेत. एकाच वेळी पुस्तक, चित्रपट आणि टीव्ही कार्यक्रम हे सर्वोच्च स्थानी असण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. सन २००८मध्ये मायकेल क्रायटन यांचा मृत्यू झाला, त्यावेळी 'मायक्रो' ही कादंबरी जवळजवळ पूर्ण झाली होती. त्यांच्या मृत्यूनंतर ती रिचर्ड प्रेस्टन यांनी पूर्ण केली.



**रिचर्ड प्रेस्टन** हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक असून त्यांची आठ पुस्तके गाजलेली आहेत. त्यात द हॉट झोन, वाइल्ड ट्रीज आणि डेमन इन द फ्रीझर यांचा समावेश आहे. अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स ॲवॉर्ड, नॅशनल मॅगझीन ॲवॉर्ड इ. मानसन्मान त्यांना लाभले आहेत. सेंटर्स फॉर डिसीज कन्ट्रोल या संस्थेकडून दिला जाणारा प्रतिष्ठेचा चॅम्पियन ऑफ प्रिव्हेन्शन ॲवॉर्ड हा सन्मान त्यांना मिळाला आहे. वैद्यकीय डॉक्टर नसूनही तो पुरस्कार मिळालेले ते एकमेव आहेत.

TBC-28 Book No. 3




**मायकेल क्रायटन**

आणि

**रिचर्ड प्रेस्टन**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

*ज्युरासिक पार्कच्या लेखकाची रानटी निसर्ग आणि अत्याधुनिक विज्ञान यांच्या झुंजीबद्दलची भयकारक कहाणी.*

*होनोलुलूमधल्या एका बंदिस्त ऑफिसात तीन माणसे मृतावस्थेत आढळली. झगडा झाल्याची काहीही चिन्हे दिसत नव्हती, तरीही त्यांच्या अंगावर अत्यंत धारदार शस्त्रांच्या असंख्य खुणा होत्या.*

*नॅनीजेन ही सूक्ष्मजीवशास्त्रातील आघाडीची कंपनी.*

*केम्ब्रिज, मॅसॅच्युसेट्स इथल्या सात ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना हवाई येथे आमंत्रित करते. तिथे त्यांना वैज्ञानिक जगतातली नवी विलक्षण प्रगती बघायला मिळेल;*

*पण हे विद्यार्थी मृत्यूच्या जबड्यात प्रवेश करणार आहेत.*

*विद्यार्थ्यांच्या या गटाला अमर्याद ताकदीचे, कल्पनाही करता येणार नाही असे तंत्रज्ञान बघता येते; पण ते विद्यार्थी हवाईच्या घनदाट वर्षारण्यात फेकले जातात. अशा पर्यावरणात की, जिथे मृत्यूने गाठण्याची खात्री आहे. त्यांना नष्ट करण्यासाठी सज्ज असलेल्या आक्रमक मानवी हितसंबंधांवर मात करून जगण्यासाठी, निसर्गाच्याच विघातक ताकदीचा त्यांना वापर करावा लागतो.*

('मायक्रो' पुस्तकातून)

**नॅनीजेन ॲनिमल फॅसिलिटी**

**२८ ऑक्टोबर, रात्रीचे ९**

व्हिन ड्रेकनं एक प्लॅस्टिकची पिशवी घेतली. आश्चर्य वाटावं इतक्या हळुवारपणे त्यानं पीटरला उचलून पिशवीत टाकलं. पीटर प्लॅस्टिकच्या पृष्ठभागावरून घसरत खाली जाऊन स्थिरावला. तो उठून उभा राहिला आणि बाहेरचं दृश्य पाहू लागला.

ड्रेकनं सगळीकडे फिरून एकापाठोपाठ एक असं सगळ्या विद्यार्थ्यांना पिशवीत टाकलं. सगळ्यात शेवटी नॅनीजेनच्या कर्मचाऱ्याला उचललं आणि पिशवीत टाकलं. त्याला टाकण्याच्या वेळी त्याचा आवाज ऐकू आला, ''मिस्टर ड्रेक... मिस्टर ड्रेक! सर...'' असं तो म्हणत होता; पण एकतर ते ड्रेकला ऐकू आलं नसावं किंवा त्याला फिकीर वाटत नसावी.

सर्वजण पिशवीत घसरून खाली येऊन पडले; पण कोणालाही इजा मात्र झाली नाही. बहुधा इजा होण्याजोगं वस्तुमानच त्यांच्याजवळ नव्हतं. ''आपल्याला जवळजवळ काहीच वजन नाही,'' अमर म्हणाला, ''आपलं वजन जेमतेम एखादा ग्रॅम असेल-नसेल. म्हणजे छोट्या पिसापेक्षाही कमी.'' अमरचा आवाज वरकरणी शांत वाटला; पण पीटरला मात्र त्याच्या आवाजात जराशी घबराट जाणवली.

''हं... ते किती आहे हे मला कळावं अशी इच्छा नाही... कळलं तरी काय फरक पडतो... मला भीती वाटतेय,'' रिक अडखळत म्हणाला.

''होय, सगळ्यांची तीच अवस्था आहे,'' कॅरेननं कबूल केलं.

''मला वाटतं, आपल्या सगळ्यांना जबरदस्त धक्का बसलाय,'' जेनी लिन म्हणाली, ''आपल्या सगळ्यांच्या ओठांभोवती पांढरी कड स्पष्ट दिसते आहे. भीतीचं मुख्य लक्षण.''

''काहीतरी घोटाळा झाला आहे,'' नॅनीजेनचा कर्मचारी हे वाक्य पुन:पुन्हा म्हणत होता. ड्रेकनं जे काही केलं होतं त्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता.

''तू कोण आहेस?'' कोणीतरी विचारलं.

''माझं नाव जॅरेल किंस्की. मी टेन्सरचा जनरेटर चालवतो. मला फक्त एकदा मिस्टर ड्रेकशी बोलायची संधी हवी आहे. म्हणजे मग मला खात्रीनं ''

''तू खूप काही बघितलं आहेस,'' रिकनं त्याचं वाक्य अर्धवट तोडलं,

‘‘ड्रेक आता आमचं जे काय करणार आहे, तेच तुझंही होणार.’’

‘‘चला, आपल्याकडे काय काय आहे ते पटकन बघू या,’’ कॅरेन एकदम म्हणाली, ‘‘लवकर... आपल्याजवळ काय काय शस्त्रं आहेत?’’

पण हे बोलणं तितकंच राहिलं, कारण पिशवी सारखी गदागदा हलत असल्यानं सगळे एकमेकांत गुंतून पडत होते.

‘‘ऑ... ऑ...’’ अमर उठून नीट बसायचा प्रयत्न करत म्हणाला, ‘‘आता काय होणार?’’

ॲलिसन प्लॅस्टिक पिशवीत बघू लागली. बाहेरच्या बाजूला तिच्या पापण्या फडफडत होत्या. तिच्या नाकावरची छोटी छिद्रं खूप मोठी वाटत होती. तिच्याकडे बघून तिला आतल्या सर्वांबद्दल चिंता वाटत असावी, असं दिसत होतं.

‘‘व्हिन... त्यांना... काही... म्हणजे अपाय... व्हिन!’’

‘‘मी... त्यांना...’’ व्हिनच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं होतं, ‘‘स्वप्नातही मी... त्यांना... अपाय...’’

**‘‘तुमच्या हे लक्षात** येतंय का?’’ कॅरेन म्हणाली, ‘‘हा माणूस पिसाट झाला आहे. तो काहीही करू शकतो.’’

‘‘होय,’’ पीटर म्हणाला.

‘‘मि. ड्रेकच्या बाबतीत हे असं म्हणता येणार नाही,’’ किंस्की म्हणाला, ‘‘यामागे काहीतरी कारण असणार.’’

कॅरेननं किंस्कीकडे साफ दुर्लक्ष केलं. ती पीटरला म्हणाली, ‘‘आत्ता या क्षणी आपण ज्या अवस्थेत आहोत ती बघता ड्रेकच्या मनात काय चाललं आहे, याबद्दल आपण कोणत्याही भ्रमात न राहिलेलं बरं. त्यानं तुझ्या भावाला मारलं हे आम्ही सगळ्यांनी त्याच्याच तोंडून ऐकलं आहे. तो आता आपल्या सगळ्यांना ठार करणार आहे.’’

‘‘तुला खात्रीनं असं वाटतं?’’ डॅनी मिनोट म्हणाला, ‘‘आपण एवढ्या घाईघाईनं निष्कर्ष–’’

‘‘होय, डॅनी. कदाचित पहिली वेळ तुझीच येईल.’’

‘‘हे तू पीटरच्या भावाला विचारून पाहा की–’’

कॅरेनचं बोलणं अर्धवटच राहिलं, कारण आता ड्रेक प्लॅस्टिकची पिशवी उचलून घेऊन कॉरिडॉरमधून निघाला होता. चालता चालता तो ॲलिसनशी काहीतरी वाद घालत होता; पण त्यांचं बोलणं ऐकू येत नव्हतं.

दूर कुठेतरी गडगडाट व्हावा असं वाटत होतं इतकंच. ड्रेक आता एक दरवाजा उघडून आत शिरला. प्लॅस्टिकच्या पिशवीच्या आत असूनही त्यांना ती जागा कोणती आहे ते समजलं. त्यांना एकदम नाकाला झोंबणारा तीव्र दर्प आला होता.

लाकडाचा आणि विष्ठेचा वास.

प्राणी!

"ही प्राणी प्रयोगशाळा आहे," अमर म्हणाला. खरोखरच त्यांना पिशवीच्या आतून स्पष्ट दिसत नसलं तरी तिथे ठेवलेले उंदीर, हॅमस्टर, सरडे आणि इतर प्राणी दिसले.

ड्रेकनं आता पिशवी काचेच्या पृष्ठभागावर ठेवली. हे एखाद्या काचेच्या टँकचं झाकण असावं असं दिसत होतं. ड्रेक आत्ताही बोलत होता. त्याच्या बोलण्याचा रोख त्यांच्यावरच होता हे जाणवत असलं तरी त्यांना शब्द मात्र ऐकू येत नव्हते. ते एकमेकांकडे बघत होते.

"तो काय म्हणतोय?"

"कळत नाही."

"तो वेडा झालाय."

"काय म्हणतोय कोण जाणे?"

जेनी लिन मात्र इतरांमध्ये सामील झाली नव्हती. ती एकटक ड्रेककडे बघत, ऐकत होती. ती पीटरकडे वळली, "तुझं नाव घेतलं त्यानं. काहीतरी तुझ्याबद्दल बोलत होता."

"म्हणजे?"

"बहुधा तुला तो अगोदर ठार करणार आहे... थांब..."





२री आवृत्ती

डिस्क्लोजर

प्रास्ताविक : **मायकेल क्रायटन** | अनुवाद : **माधव कर्वे**

माणूस नावाच्या प्राण्याच्या
अथांग भावविश्वाचा घेतलेला वेध

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.**

"काय म्हणालीस–"

जेनीनं कमरेच्या पट्ट्यात अडकवलेली पिशवी उघडली. त्यात अगदी पातळ अशा डझनभर काचनळ्या होत्या. प्रत्येक नळीच्या टोकाला रबराचं बूच लावलेलं होतं. "मी आणलेली व्होलटाइल द्रव्यं," जेनी म्हणाली. तिच्या या नळ्या म्हणजे तिनं अनेक वर्षं केलेल्या कठोर परिश्रमांचं फळ होतं. तिनं त्यातली एक नळी काढून पीटरच्या हातात दिली, "मी हे इतकंच देऊ शकते."

पीटर मान हलवत राहिला. त्याला काही समजत नव्हतं. जेनीनं पीटरच्या हातातल्या नळीचं बूच उघडलं आणि त्यातला द्रव पीटरच्या डोक्यावर ओतला. तो द्रव त्याच्या अंगावर सांडला. क्षणभर अत्यंत उग्र असा वास आला आणि मग तो नाहीसा झाला.

"हे काय होतं?" पीटरनं विचारलं.

जेनीनं उत्तर द्यायच्या आत ड्रेकनं पिशवी उघडली होती. त्याचा मोठा हात आत आला आणि त्यानं पीटरच्या पायाला धरून त्याला खाली डोकं, वर पाय अशा अवस्थेत उचललं. पीटर किंचाळून हात हलवू लागला. वर जाताजाता त्याला जेनीचे शब्द पुसटसे ऐकू आले, "हेक्झेनॉल... गांधिलमाशांपासून मिळवलं... गुडलक पीटर."

"हं... तरुण... पीटर..." ड्रेक गडगडाटी आवाजात बोलत होता. त्याचे काहीच शब्द कळत होते, "तू मला... खूप त्रास..." त्यानं पीटरला आपल्या नाकाजवळ आणलं आणि डोळे बारीक करून त्याच्याकडे बघत विचारलं, "घाबरला आहेस?... असणारच..."





८वी आवृत्ती

**केल्याने होत आहे रे...**

**प्रा. श्री. अ. दाभोळकर**

'सूर्याकडून वनस्पतींनी गोळा केलेली कार्यशक्ती जीवसृष्टीत जेवढी फिरत राहिल, तेवढी अधिक समृद्धी येईल' सांगत आहेत, श्री. अ. दाभोळकर आपल्या 'केल्याने होत आहे रे' या पुस्तकातून.

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

ड्रेकनं एकदम काचेचं झाकण जेमतेम इंचभर सरकवलं आणि पीटरला टँकमध्ये टाकलं. वेगानं झालेल्या या हालचालीमुळे पीटरला भोवळ आल्यासारखं झालं; पण पुढच्याच क्षणी तो आतमधल्या लाकडाच्या भुश्श्यात आदळला. ड्रेकनं लगेच झाकण बंद करून घेतलं. त्यावरची प्लॅस्टिकची पिशवी त्यानं तशीच राहू दिली होती.

**''व्हिन, मला हे** मान्य नाही,'' ॲलिसन म्हणाली, ''आपण याबद्दल बोललो नव्हतो–''

''परिस्थिती बदलली आहे हे उघड आहे, तेव्हा–''

''पण हे वागणं अविवेकी आहे.''

''विवेक-अविवेक याबद्दल मला सांग, मी ऐकेन; पण नंतर.''

ॲलिसननं एरिकला उडवण्यासाठी व्हिनला मदत करायची हे कबूल केलं होतं, कारण एरिकनं नॅनीजेन नष्ट करण्याची धमकी दिली होती. तिचं व्हिनवर प्रेम होतं आणि अद्यापही आपण त्याच्यावर प्रेम करतो असं तिला वाटत होतं. व्हिन तिच्याशी अत्यंत चांगला वागत होता. त्यानं तिला प्रत्येक बाबतीत मदत केली होती. तिची सतत फुगणारी बिलं तो भागवत असे. एरिक व्हिनशी वाईट वागला होता... त्यानं व्हिनचा विश्वासघात केला होता... पण हे विद्यार्थी मात्र निराळे होते... पण आता परिस्थिती हाताबाहेर जायला लागली होती. सगळं फार वेगानं घडलं होतं. ॲलिसन गोंधळून गेली होती. ड्रेकला कसं थांबवावं हे तिला कळत नव्हतं.

''शिकारी अजिबातच क्रूर नसतो,'' ड्रेक म्हणाला. तो साप ठेवलेल्या टँकसमोर उभा होता, ''उलट ते फारच मानवी असतं. काचेच्या आत आहे तो पट्टेपट्टे असणारा साप मलेशियातल्या मण्यार जातीचा आहे. पीटरच्या आकाराच्या प्राण्याच्या दृष्टीनं त्याचा पहिलाच चावा प्राण हिरावून घेणारा ठरेल. त्याला काहीही कळणार नाही. तो अडखळत बोलू लागेल आणि मग सगळं शरीर पूर्ण शिथिल होईल. हे सगळं घडायला अवघे काही क्षण लागतील. कदाचित साप त्याला गिळेल तेव्हा तो जिवंत असेल, पण सापाला त्यामुळे काहीच फरक पडणार–''

ड्रेकनं प्लॅस्टिकची पिशवी चिमटीत धरली आणि ती हलवली. आतली छोटी माणसं इतस्तत: इकडून तिकडे फेकली गेली. घबराट आणि रागानं शिव्याशाप देणाऱ्या त्या सर्वांकडे बघत ड्रेक म्हणाला, ''हे लोक किती गमतीशीर आहेत ना? ॲलिसन, मला वाटतं, मण्यार त्यांना सहज

स्वीकारेल. अर्थात, त्यानं स्वीकारलं नाही तर मग नाग आणि कोरल स्नेक आहेतच म्हणा.''

ॲलिसन तिटकाऱ्यानं दुसरीकडे बघत होती.

''हे गरजेचं आहे ॲलिसन,'' ड्रेक म्हणाला, ''त्यांची शरीरं अशीच गिळून टाकली जायला हवीत. त्यांच्या अस्तित्वाचा... कोणताही पुरावा मागे राहता कामा नये.''

''पण हे एवढं पुरेसं नाही. त्यांच्या गाड्या, त्यांच्या हॉटेलमधल्या खोल्या आणि त्यांची विमानाची तिकिटं यांचं काय?''

''त्याबद्दल माझी योजना तयार आहे.''

''होय का?''

''माझ्यावर विश्वास ठेव,'' ड्रेक तिच्याकडे रोखून बघत म्हणाला. मग काही क्षणांनंतर पुन्हा तिला विचारलं, ''तुझा माझ्यावर विश्वास नाही?''

''नाही, मला तसं म्हणायचं नाही.''

''हे असंच मत योग्य आहे, कारण विश्वास नसेल तर सगळं व्यर्थ ठरेल. ॲलिसन, आपण यात बरोबरीनं काम करतोय. होय ना?''

''होय.''

''मला त्याची कल्पना आहे,'' ड्रेकनं तिच्या हातावर हलकेच थोपटलं, ''हं... तिकडे बघ, पीटर आता धूळ झटकत उभा राहिला आहे आणि साप आता भक्ष्याच्या शोधात निघाला आहे. त्याच्या अंगावरचे काळे पट्टे भुश्श्यात अर्धवट दडले असल्यामुळे तो नीट दिसत नाही; पण त्याची काळी जीभ सारखी आत-बाहेर होताना दिसते आहे. आता नीट बघ ॲलिसन, सगळं फार वेगानं घडेल.''

पण ॲलिसननं नजर दुसरीकडे वळवली.

◆





**९वी आवृत्ती**

**मजल... दरमजल...**

लेखिका : **किरण बेदी**
साहाय्यक : **सरोज वशिष्ठ**

अनुवाद : **भारती पांडे**

आपलं कर्तव्य कठोर निष्ठेने पार
पाडताना किरण बेदींना आलेल्या अनुभवांचं कथन

**किंमत : १४०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# माय नेम इज परवाना



डेबोरा एलीस ही ओन्टारिओ इथं राहते. स्त्री-मुक्तीवादी कार्यकर्ती म्हणून आणि शांतता मोहिमेअंतर्गत तिनं जगभरातल्या देशांत काम केलं आहे.अविकसित, गरीब, मागास राष्ट्रांतल्या मुलांचं खडतर जगणं विकसित देशातल्या माणसांसमोर ठेवणारी एक अत्यंत संवेदनशील लेखिका. तिच्या अत्यंत धाडसी अनुभवांना तिनं तितक्याच रोमांचकारी शैलीत वाचकांसमोर मांडलं. जगभरातल्या सत्तासंघर्षात भरडल्या जाणाऱ्या अबोध, निरागस मुलांची वाताहत हाच तिच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. तिच्या सगळ्याच पुस्तकांना देशविदेशांतून पुरस्कार मिळाले आहेत. गव्हर्नर जनरलचा प्रतिष्ठित पुरस्कार, स्वीडनचा 'पीटर पॅन पुरस्कार', 'द रूथ स्वार्ट्झ पुरस्कार' इ.

जगभरात तिची 'ब्रेडविनर' ही ट्रायॉलॉजी खूप गाजली. जगभरातल्या सतरा भाषांमध्ये तिची ही पुस्तकं अनुवादित झाली आहेत. जगभरातल्या वाचकांनी या पुस्तकांना भरभरून प्रतिसाद दिला. तिला रॉयल्टी म्हणून मिळालेल्या रकमेतून लक्षावधी डॉलर्स 'स्ट्रीट किड्स इंटरनॅशनल' आणि 'वुमन फॉर वुमन' या संस्थांना दान देण्यात आले आहेत. 'वुमन फॉर वुमन' ही संस्था अफगाणिस्तानातून पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या आणि निर्वासितांचं आयुष्य जगणाऱ्या मुलींच्या शिक्षणासाठी काम करते.




**डेबोरा एलीस**

अनुवाद
**अपर्णा वेलणकर**

*परवानाचं पुढे काय झालं?*

*तालिबान्यांचा पराभव झाल्यानंतरच्या अफगाणिस्तानात अमेरिकन सैनिकांनी एका अफगाण मुलीला अटक करून ताब्यात घेतलं आहे. पण आहे कोण ती मुलगी? बॉम्बहल्ल्यात उद्‌ध्वस्त झालेल्या एका शाळेचे ढिगारे उपसत का ती तिथे वेड्यासारखी एकटी फिरत होती? ती दहशतवादी असेल का? अमेरिकन सैन्याच्या तळावर बंदिवासात टाकलेल्या त्या अफगाण मुलीची उलटतपासणी सुरू होते. पण ती एकाही प्रश्नाचं उत्तर देत नाही. ओठ घट्ट मिटून गप्प राहते. छळ होतो, मारहाण होते; तरी ती बधत नाही. कोण असेल ती मुलगी?*

*एकच सुगावा असतो अमेरिकन लष्कराच्या हाती : त्या मुलीकडे सापडलेली खांद्यावर लटकवायची एक कापडी, फाटकी मळलेली पिशवी आणि त्यातले काही कागद. त्यावर काही नावं लिहिलेली... शौझिया, नूरिया, लैला, हसन, आसीफ... आणि परवाना. खूप काळ प्रतीक्षेत असलेला हा 'द ब्रेडविनर' या पुस्तकमालिकेचा पुढचा भाग.*

*आता परवाना पंधरा वर्षांची झाली आहे. अमेरिकन सैन्याच्या ताब्यात असताना तिला तिच्या आयुष्यातली चार वर्षं आठवतात. अम्मी आणि बहिणींना भेटल्यावर एका खेडेगावात त्यांचं कुटुंब पुन्हा जगू लागतं. आणि जिवापाड प्रयत्न करून अम्मी तिचं स्वप्न साकार करते : अफगाण मुलींसाठी शाळा सुरू करण्याचं स्वप्न. शाळा सुरू होते आणि परवानाला तिच्या स्वप्नातलं, हवंहवंसं आयुष्य पुन्हा मिळतं. ... पण हा अफगाणिस्तान आहे. युद्ध अजून संपलेलं नाही आणि मुलींचं शिक्षण, मुलींचं स्वातंत्र्य ही या देशात संशयानं, रागानं पाहण्याची गोष्ट आहे. याचाच अर्थ, परवाना आणि तिच्या कुटुंबाच्या डोक्यावरची लटकती तलवार अजूनही तशीच आहे.*

('माय नेम इज परवाना' पुस्तकातून)

"पण हे मशिन चालवतात कसं, ते कसं कळणार मला?"

गावातल्या बाजारपेठेत एका शिंप्याच्या दुकानात असीफ आणि अम्मीच्या मागे परवाना उभी होती.

तेवढ्यात त्या शिंप्यानं एक खुर्ची पुढे ओढली, शिलाई मशिनच्या समोर ठेवली आणि अम्मीला खूण केली, की बसा तुम्ही इथे आणि चालवून पाहा मशिन. सोपं असतं ते.

परवानाला हसूच फुटलं.

तालिबान्यांनी अफगाणिस्तानचा ताबा घेतला, त्याच्या आधी पत्रकार होती अम्मी, आणि आता अख्ख्या शाळेची मुख्याध्यापक आहे. म्हणजे किती गोष्टी येतात तिला... पण शिवणाचं मशिन नाही चालवता येत.

अम्मीनं असीफकडे पाहिलं. त्यानंही कधी चालवलं नव्हतं शिवणाचं मशिन. पाहिलंही नव्हतं याआधी कधी. पण शेवटी असीफ होता तो. कुठल्याही नव्या यंत्राबरोबर पटकन मैत्री होतेच त्याची. त्याला तर एका मिनिटात चालवता येईल ते मशिन!– परवाना उत्सुकतेनं पाहत राहिली.

"हे पाहा, हे मशिन चालवण्यासाठी वीज लागत नाही"– तो शिंपी असीफला मशिन कसं चालवतात ते दाखवत होता, 'नुसती पायांनी ही खालची झडप हलवली, की मशिन चालायला लागेल

असीफ मशिनसमोर खुर्चीवर बसला आणि त्यानं खालच्या झडपेवर दोन्ही पाय ठेवले. थोड्याच वेळात त्याला मशिन चालवता येऊ लागलं. त्यानं त्या शिंप्याकडून कापडाचा छोटा तुकडा घेतला आणि त्याच्या कडा दुमडून टीप मारून पाहिली. आधी थोडी गडबड उडाली, पण हात बसला, तशी असीफला सरळ एका रेषेत शिलाई घालता आली.

"काहीतरी अडकतंय का?"– असीफनं विचारलं. मशिन मध्येच थांबल्यासारखं वाटत होतं.

"काही नाही, थोडं तेल घालावं लागेल... की नव्यासारखं चालेल हे मशिन"– तो शिंपी हसून म्हणाला.

"बरं, बाकीची मशिन्स बघू या?"– असीफनं उत्सुकतेनं विचारलं.

तो शिंपी असीफला घेऊन दुकानाच्या मागच्या बाजूला गेला. तिथे जास्तीची मशिन्स होती.

शाळेत मुलींसाठी शिवणाचा वर्ग सुरू करण्याची तयारी चालली होती.

''असीफला थोडा वेळ लागेल बहुतेक,''– अम्मी परवानाला म्हणाली, ''चल, तोवर आपण बाजारात जाऊन जरा कापड बघून येऊ.''

त्या दोघी बाजाराच्या दिशेनं निघाल्या. कापडबाजार जवळच होता तिथून. बाजार म्हणजे काय?– कापडाचे लांबच लांब तागे एखाद्या झाडाच्या फांदीसारखे उलगडून ठेवलेली एक गल्लीच लांबच्या लांब. कितीतरी रंग... आणि कितीतरी प्रकारची कापडं.

अम्मीनं त्यातल्या त्यात जरा मोठं आणि कापडाचे बरेच प्रकार असलेलं दुकान निवडलं आणि त्या दुकानदाराबरोबर बोलणी सुरू केली. परवाना तिच्या मागेमागेच होती. तिनं तिला आवडलेल्या रंगाचे, पोताचे तागे सुचवायला सुरुवात केली, की हे कापड घेऊ या विकत; पण अम्मीचं तिच्याकडे लक्षच कुठे होतं?

–अम्मीच्या डोक्यात तिच्या स्वतःच्याच इतक्या कल्पना होत्या.

ती दुकानदाराशी बोलणी करण्यात पार गढून गेली होती.

शाळेचं पहिलं वर्ष संपलं होतं. नव्या वर्षाची सुरुवात होणारच होती काही दिवसांत. नूरिया न्यू यॉर्कला जाऊन तीन आठवडे उलटले होते. ते पत्र आल्या दिवसापासून अमेरिकेला जायला निघेपर्यंत नूरिया परवानाशी कधी नव्हे अशा प्रेमानं वागली होती.

नूरिया गेल्यावर चार दिवस अम्मी उदास होती. कुणाशी बोलली नाही. रडतही असावी स्वतःशीच. पण मग ती सावरली आणि कामात बुडून गेली. आपल्याबरोबर तिनं सगळ्यांनाच कामाला जुंपलं. परवाना, मरियम आणि असीफला धुणं–पुसणं– शाळा झाडून काढणं आणि रंगवणं अशी कितीतरी कामं होती. शिवाय बागेत काम करावं लागे ते वेगळंच. एवढं करून तिघंही रात्री उशिरापर्यंत अभ्यासाला बसत.

अपूर्णांकांच्या गुणाकाराची गणितं जमू लागल्यावर परवानाचा अभ्यासातला रस परतला होता. ती चिकाटीनं अभ्यास करत होती. सहावी आणि सातवीच्या अभ्यासाचा फडशा पाडून आता हळूहळू आठवीच्या पुस्तकांकडे वळू लागली होती.

''असाच वेग ठेवलास अभ्यासाचा; तर तू लवकरच हायस्कूलमध्ये जाशील.''– कधी नव्हे ती अम्मी परवानाच्या अभ्यासाचं कौतुक करू लागली होती. परवाना लवकरच तिच्या वयाच्या मुलींच्या बरोबरीनं येईल, याची अम्मीला खात्री होती.

परवानाच्या डोक्यात काही दुसराच बेत शिजत होता.

असाच अभ्यासाचा धडाका लावायचा आणि थेट फ्रान्समध्ये, पॅरिसलाच जाऊन राहता–शिकता येईल, अशी स्कॉलरशिप मिळवायची!

आपण अभ्यास करू... मग आपल्याला स्कॉलरशिप मिळवून पॅरिसला जाता येईल, तिथे आपल्याला शौझिया भेटेल...

परवानाच्या मनात कधीचं एक स्वप्न आकार घ्यायला लागलं होतं...

मग नूरिया म्हणेल, ''न्यू यॉर्कला ये ना गं मला भेटायला. माझ्या घराच्या खिडकीतून स्टॅच्यू ऑफ लिबर्टी दिसतो, माहितीये तुला?''

मग आपण तिला उलट पत्र पाठवून कळवू, की,

''स्टॅच्यू ऑफ लिबर्टी छानच दिसत असणार तुझ्या घरातून; पण पॅरिसला आमच्याकडे आयफेल टॉवर आहे; कळलं? आयफेल टॉवर! आणि हो एक सांगायचं राहिलंच, मी हल्ली तिथेच राहते, आयफेल टॉवरमध्ये. मी विकत नाही का घेतला तो? आता मीच मालकीण आहे त्याची. आणि त्याच्या आत मी माझ्यासाठी नवीन घर बांधून घेतलंय, कळलं?''

आयफेल टॉवर आपल्या मालकीचा असणं आणि त्याच्या आत बांधलेल्या घरात आपण राहत असणं, ही नुकतीच सुचलेली नवी कल्पना परवानाला भलतीच आवडली. तिनं लगेच खिशातून तिचं पेन आणि कागद बाहेर काढला. हल्ली ती या दोन गोष्टी खिशातच घेऊन फिरत असे. सतत इतक्या कल्पना सुचतात; त्या डोक्यातून अदृश्य होऊन गेल्या तर?– त्यापेक्षा जे सुचतं ते आता लिहूनच ठेवायचं, असं परवानानं मनाशी ठरवलं होतं. स्मरणशक्तीवर विश्वास तरी किती ठेवणार?

पॅरिसच्या आयफेल टॉवरमध्ये बांधलेल्या घराची ती कल्पना परवानानं लगेच लिहून काढली. त्याच्याखाली आयफेल टॉवरचं एक चित्रही काढलं. या टॉवरवर इतके सारे मजले आहेत, तर आपण आपलंही घर असं मजल्या मजल्यांचं बांधू. त्या घराच्या चारही बाजूंना खिडक्या असतील. म्हणजे उंचावरून त्या खिडक्या उघडून खाली पाहिलं, की जमिनीवरून कोणकोण चालतंय ते सगळं दिसेल. आपण त्या घरात राहायला गेलो की सर्वांत उंच मजल्यावरच्या खिडकीतून मोठेमोठे कापडी फलक खाली सोडायचे.

एकावर लिहायचं, *हे परवानाचं घर आहे.*

आणि दुसऱ्यावर लिहायचं,

*लवकर ये शौझिया, परवानाच्या घरी तुझं खूपखूप स्वागत!*

आयफेल टॉवरमध्ये बांधलेल्या त्या घरात एक झोपाळा टांगता येईल का, याच्या विचारात परवाना गढली होती, तेवढ्यात जरा वर ठेवलेला हिरव्या कापडाचा तागा उचलता उचलता अम्मी तिला येऊन धडकली.

त्या धक्क्यानं परवानाच्या हातातलं पेन कुठेतरी पडलं आणि मागोमाग अम्मीचा ओरडा कानी आला.

"इथे नुसती अशी उभी राहण्यापेक्षा जरा मला मदत करशील तर बरं होईल, कळलं तुला?"

– आयांना सवयच असते येता-जाता हे असं बोलायची. खरं म्हणजे परवानाला मदतच तर करायची होती अम्मीला, पण तिला हवीच कुठे होती मदत? कापडाचे रंग आणि तागे तर तिलाच एकटीला निवडायचे होते ना आपल्या मनानं! कापडाची निवड झाली की मग ते तागे उचलायला परवानाची मदत लागणार होती!

आता पेन कुठे गेलं आपलं? खाली तर पडलं होतं अम्मीच्या धक्क्यानं; पण पायाशी शोधूनही परवानाला काही केल्या ते सापडेना.

ती शोधत राहिली.

शेवटी दिसलं तिचं पेन. अम्मीशी वाटाघाटी करण्यात गढलेल्या दुकानदाराच्या पायाशी घरंगळत जाऊन थांबलं होतं.

आता त्याला कसं सांगावं, की बाबा, जरा ते पेन देतोस का माझं?– परवानाला प्रश्नच पडला.

आधीच अम्मीच्या चौकशीला आणि प्रश्नांना तोंड देतादेता बिचारा पार दमून गेला होता.

तो दुकानदार स्वतःच कधी पाय हलवतो याकडे परवाना लक्ष देऊन उभी होती.

तेवढ्यात अम्मीनं सगळ्यात वरच्या फळीवरचा एक तागा बघायला मागितलाच. दुकानदार तागा काढायला पुढे झाला, पण चुकून त्याच्या पायाचा धक्का लागून परवानाचं पेन गडगडत आणखीच पुढे निघून गेलं.

– परवाना त्या पेनामागे धावली.

एका जागी जाऊन ते थांबलं.

परवाना पेन उचलायला पुढे होणार, तेवढ्यात रस्त्यानं चालणाऱ्या

कुणाच्यातरी पावलांचा धक्का लागून ते आणखी पुढे गडगडत गेलं.

परवाना आणखी पुढे धावली.

मग हा पाठलागाचा खेळ चालूच झाला.

परवानाला गंमतच वाटत होती सगळी. एवढी मोठी मुलगी गडगडत पुढे जाणाऱ्या एका पेनाच्या मागे भर बाजारात धावते आहे, हे बघून सगळे आपल्याला हसत असणार, हेही तिला माहिती होतं.

गडगडत धावणारं ते पेन शेवटी एकदाचं कापडगल्लीच्या टोकाला असलेल्या चादरींच्या एका दुकानापुढे जाऊन थांबलं.

परवाना ते पेन उचलायला खाली वाकली.

उभी राहून मागे वळणार, तेवढ्यात तिचा श्वासच थांबला.

त्या दुकानापुढच्या भिंतीवर कागदावर लिहिलेला एक जाहीर इशारा चिकटवलेला होता :

*जे कुणी पालक आपल्या मुलींना त्या लैला नावाच्या शाळेत पाठवतात, त्यांच्यासाठी इशारा– ही शाळा दुष्ट, धर्मभ्रष्ट लोक चालवतात. अशा धर्माच्याविरुद्ध चालणाऱ्या शाळेत तुमच्या मुली जात असतील, तर तुम्हीही धर्मद्रोहीच आहात. धर्माचे आदेश न मानणाऱ्या अशा लोकांचा खातमा केला जाईल, लक्षात ठेवा!*

डोळे विस्फारून परवाना बघतच राहिली.

भिंतीवर चिकटवलेल्या त्या कागदावरून तिची नजर हटेना. पायाला खिळे ठोकल्यासारखी ती एका जागी निश्चल उभी होती.

''इथे आहेस का तू?''

– तिला शोधत शोधत धापा टाकत आलेल्या अम्मीच्या हातात कापडाच्या ताग्यांचा मोठा ढीगच होता.

''जरा मदत कर, परवाना. तुझ्यापेक्षा ती मरियम आणि हसन तरी कमी त्रास देतात मला. जरा नजर चुकवली तुझ्यावरून की गेलीसच तू कुठेतरी उंडारायला.''

भिंतीवर चिकटवलेल्या त्या कागदावरची अक्षरं वाचताच अम्मीचे शब्द तोंडातल्या तोंडातच राहून गेले.

परवानानं हातातलं पेन खिशात ठेवलं, आणि संतापानं उसळत ती त्या

कागदावर तुटून पडली. नखानं कुरतडून कुरतडून तो अख्खा कागद काढून फेकायचा इतका प्रयत्न केला परवानानं, पण त्या कागदाला गोंद लावून तो भिंतीवर पक्का चिकटवला होता.

"परवाना, चल इथून.....''– अम्मीने तिचं बखोट धरून तिला मागे खेचलं.

पण परवाना चिडली होती. नखानं कुरतडून कागद फाटेना, तेव्हा तिनं खिशातलं पेन काढून त्यानं त्या कागदावर एकामागूनएक वार करत तो इशारा भोसकायला सुरुवात केली. तेही जमेना, तेव्हा मग तिनं पेन घेऊन त्या कागदावर रेषारेषांचं जाळं गिरगिटायला घेतलं.

"परवाना, चल, चल इथून...''

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


# मेहता पब्लिशिंग हाऊस




## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* इतर पुस्तके २०% सवलतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

# पुस्तक परिचय



# स्वर्गाचा साक्षात्कार



**टॉड बर्पो** हे नेब्रास्कातील इम्पीरिअल या गावी क्रॉसरोड्स वेस्लेयान चर्चचे धर्मोपदेशक आहेत. त्यांची प्रवचने तिथल्या रेडिओ केंद्रातून प्रत्येक रविवारी प्रक्षेपित केली जातात. ते एका शाळेत विद्यार्थ्यांना कुस्तीचे मार्गदर्शन करतात. ते स्कूल बोर्डाचेही सदस्य आहेत. आणीबाणीच्या प्रसंगी टॉड बर्पो, जवानांबरोबर स्वयंसेवक म्हणून खांद्याला खांदा लावून आगीशी झुंजताना दिसतात. 'नेब्रास्का स्टेट व्हॉलेंटियर फायर फायटर्स असोसिएशन'चे ते चॅप्लीन– धार्मिक विधी करणारे– आहेत. उदरनिर्वाहासाठी टॉड 'ओव्हरहेड डोअर स्पेशालिस्ट' ही कंपनी चालवतात. त्यांनी ओक्लाहोमा 'वेस्लेयान युनिव्हर्सिटी'ची 'ब्रह्मज्ञान' शास्त्रातील बी. ए. पदवी 'सुमा कम ल्यूड' उत्तम शैक्षणिक पात्रतेसाठी मिळणाऱ्या शेऱ्यासह मिळविली आहे. त्यांना १९९४ मध्ये दीक्षा दिली गेली.




**लीन व्हिन्सेंट** यांनी लेखिका आणि सहलेखिका म्हणून नऊ पुस्तके लिहिली आहेत. 'वर्ल्ड' या देशपातळीवर बातम्या देणाऱ्या नियतकालिकात अकरा वर्षे ज्येष्ठ लेखक, नंतर संपादक म्हणून काम केले. त्यात त्यांनी राजकारण, संस्कृती आणि सद्य:कालीन घटना यांवर लिखाण केले. ए.व्ही.एस. नेव्हीमध्ये सेवा केलेल्या लॅन या 'वर्ल्ड जर्नालिझम इन्स्टिट्यूट' आणि न्यू यॉर्क सिटी, किंग्ज कॉलेजमध्ये व्याख्यात्या म्हणूनही काम करतात. त्या कॅलिफोर्नियात सॅन दिएगो येथे राहतात.

**टॉड बर्पो**

सहलेखक
**लीन व्हिन्सेंट**

अनुवाद
**मेधा मराठे**




*कोल्टन बर्पोची अपेन्डिक्सची इमर्जन्सी शस्त्रक्रिया करावी लागली. एखादा चमत्कार घडल्यासारखा तो त्यातून वाचला म्हणून त्याच्या कुटुंबीयांना खूप आनंद झाला. तरी पुढील काही महिन्यांत अशी गोष्ट घडली की, ज्याची त्यांनी कधी अपेक्षाच केली नव्हती – ती गोष्ट खूप सुंदर आणि अलौकिक होती. त्यांचा लहानसा मुलगा स्वर्गात जाऊन परत आला, त्या सफरीचा तपशील तो सांगू लागला. चार वर्षांचासुद्धा नसलेल्या कोल्टननं आपल्या आई-वडिलांना सांगितलं की, शस्त्रक्रियेच्या वेळी तो आपलं शरीर सोडून स्वर्गात जीझसकडे गेला होता. त्याचं ऑपरेशन होत असताना हॉस्पिटलच्या दुसऱ्या भागात त्याचे आई-वडील नेमके काय करत होते, हे सांगून त्यानं आपला खरेपणा शाबीत केला. स्वर्गाच्या भेटीबद्दल तो बोलत राहिला. स्वर्गात भेटलेल्या, पण पूर्वायुष्यात कधीही न भेटलेल्या व्यक्तींनी सांगितलेल्या गोष्टी, तसेच त्याच्या जन्माआधी घडलेले प्रसंग त्यानं पुन्हा सांगितले. कोल्टन अजून वाचायलाही शिकला नव्हता, तरी तो करत असलेली स्वर्गाची वर्णनं आणि दुर्बोध तपशील बायबलशी अगदी मिळताजुळता आहे, हे बघून त्याचे आई-वडील चकित झाले. कोल्टनच्या या विलक्षण अनुभवाविषयी लिहिलंय त्याच्या वडिलांनी.*

('स्वर्गाचा साक्षात्कार' पुस्तकातून)

## नॉर्थ प्लेट

बुधवारी आम्ही इम्पीरिअल हॉस्पिटलच्या सेवक वर्गाला बातमी दिली की, आम्ही कोल्टनला नॉर्थ प्लेटमधील ग्रेट प्लेन्स रीजनल मेडिकल सेंटरला नेणार आहोत. नॉर्मानं सुचविल्याप्रमाणे त्याला डेनव्हरला चिल्ड्रेन्स हॉस्पिटललाही नेण्याचा आम्ही विचार केला. परंतु मदत मिळण्याच्या दृष्टीनं राहण्याच्या ठिकाणाच्या जवळ असणं आम्हाला योग्य वाटलं. हॉस्पिटल सोडताना थोडा वेळ लागतोच. तसा कोल्टनला घेऊन जातानाही लागला; पण आम्हाला तो खूप वाटला. शेवटी एक नर्स डिस्चार्ज देणारी कागदपत्रं घेऊन आली. त्यात कोल्टनच्या टेस्टचे रिझल्ट्स होते आणि मोठ्या पसरट खाकी पाकिटात त्याचे एक्स-रे होते. सोनयानं लहान मुलांचे डॉक्टर डेल शेफर्ड यांच्या ऑफिसच्या सेवक वर्गाला 'आम्ही येतोय' असं आधीच कळवलं होतं.

सकाळी साडेदहा वाजता मी कोल्टनला हॉस्पिटलच्या बिछान्यावरून उचललं. कोल्टनचा निर्जीवपणा जाणवून मला धक्काच बसला. हातात एखादा फाटका कपडा धरावा तसं वाटलं. खरं म्हणजे मला धडकीच भरली होती; पण मी शांत राहायचा प्रयत्न केला. निदान आता आम्ही 'काहीतरी' करत होतो. आम्ही काही कृती करत होतो.

कोल्टनची सीट मी गाडीच्या मागच्या सीटला पट्ट्याने बांधली. हळुवारपणे ठेवून त्याचा पट्टा बांधत असताना एकच विचार करत होतो की, नॉर्थ प्लेटपर्यंतचे ९० मिनिटांचे अंतर मी किती वेगाने कापू शकेन. सोनया कोल्टनबरोबर मागच्या सीटवर बसली. तिच्या हातात उलटी धरण्यासाठी हॉस्पिटलचं गुलाबी पसरट भांडं होतं.

त्या दिवशी ऊन होतं, तरी थंडी वाजत होती. मी गाडी हायवे-६१वर घेतली आणि मागे बसलेला कोल्टन दिसावा म्हणून गाडीचा आरसा थोडा वळवला. कित्येक मैल शांततेत गेले. मग मला भांड्यात उलटी केल्याचा आवाज ऐकू आला. उलटी संपल्यावर मी गाडी रस्त्याच्या कडेला घेतली. सोनयानं भांडं रस्त्याच्या कडेला रिकामं केलं. गाडी पुन्हा हमरस्त्यावर घेतल्यावर मी आरशात पाहिलं. सोनयानं खाकी पाकिटातून एक्स-रे काढले होते आणि स्वच्छ सूर्यप्रकाशात धरले होते. हळूहळू ती मान हलवायला

लागली आणि तिचे डोळे पाण्यानं भरून आले.

''आपण सगळं चुकीचं केलंय,'' ती उंच स्वरात म्हणाली. नंतर तिनं सांगितलं की, तिच्या मनातल्या काही प्रतिमा कायमच्या जळून गेल्या आहेत.

मी मान वळविली. सोनया लक्षपूर्वक बघत होती. ते तीन लहान डाग मीही पाहू शकलो. ते विचित्र आकार असलेले डाग कोल्टनच्या छायेसारख्या लहानशा शरीरात खूप मोठे वाटले. आताच ते खूप मोठे का बरं वाटत होते?

''बरोबर आहे तुझं. आपल्याला कळायला हवं होतं,'' मी म्हणालो.

''पण डॉक्टर तर...!''

''माहीत आहे. पण आपण त्यांचं ऐकायला नको होतं.''

त्या वेळी कुणाकडे बोट दाखवणं, एकमेकांना दोष देणं योग्य नव्हतं; पण आम्ही खरंच आमच्यावर चिडलो होतो. डॉक्टर म्हणाले की, एक्स-रे काढा, आम्ही तो काढला. डॉक्टर म्हणाले, शिरेतून सलाईन, औषधे – आयव्ही – द्या, आम्ही ती दिली. डॉक्टर म्हणाले, रक्ततपासणी करा. आम्ही केली. ते डॉक्टर होते, बरोबर? त्यांना माहीत होतं, ते काय करताहेत ते... बरोबर? प्रत्येक वळणावर आम्ही योग्य निर्णय घेण्याचा प्रयत्न करत होतो; पण आम्ही ते चुकीचे घेतले आणि कोल्टनला त्याची फळं भोगावी लागत होती.

माझ्यामागे गाडीच्या मागच्या सीटवर कोल्टन निष्प्राण पडला होता आणि त्याचं मौन हे मी ऐकलेल्या कोणत्याही आवाजापेक्षा भयानक मोठं होतं!

बायबलमध्ये इस्रायलचा राजा दाविद याची एक गोष्ट आहे. दाविदनं त्याचा विश्वासू सैनिक उरिय्याह याची बायको बाथशेबा हिच्याशी व्यभिचार केला. मग आपलं पापकृत्य झाकण्यासाठी त्यानं उरिय्याहला आघाडीवर लढायला पाठवलं. त्याला नक्की माहीत होतं की, उरिय्याह तेथे मरणार. नंतर प्रेषित नाथन दाविदकडे आला आणि त्याला सरळ म्हणाला, ''तू काय केलंस हे ईश्वराला माहीत आहे. तुझ्या पापाचे परिणाम असे होतील : तुझं आणि बाथशेबाचं हे मूल जगणार नाही.''

दाविदनं कपडे फाडले, रडला. त्यानं प्रार्थना केली आणि ईश्वराला कळकळीची विनंती केली. तो दुःखानं एवढा वेडापिसा झाला की, त्याचं मूल मरण पावलं, तेव्हा त्याच्या सेवकांना त्याला ते सांगायचीही भीती वाटू

लागली. पण दाविदला ते कळलं, तेव्हा तो उठला, त्यानं अंघोळ केली, खाल्लं आणि शांतपणे अंत्ययात्रेची तयारी केली. त्याच्या वागणुकीचं त्याच्या सेवकांना आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, ''महाराज, काही क्षणांपूर्वी तुम्ही आरडाओरडा करत होतात ना? ईश्वराला विनंती करत होतात, रडत होतात ना? आता तर तुम्ही शांत आहात; हे कसं काय घडलं?'' दाविदनं सांगितलं, ''ईश्वर आपलं मन बदलेल अशी मला आशा होती; पण त्यानं ते बदललं नाही.''

जेव्हा हातून अजून काहीतरी होण्यासारखं होतं, तोपर्यंत दाविद त्याला शक्य होईल तेवढं करत राहिला होता.

मी आता विचार केला तर असं वाटतं की, नॉर्थ प्लेटच्या रस्त्यावर जाताना मला असंच काहीतरी वाटलं होतं. होय, एक्स-रे चांगले नव्हते आणि माझ्या मुलाच्या चेहऱ्यावर मृत्यू दिसत होता.

''पण अजून तो मरण पावला नव्हता.''

आता हे सोडून पळून जाण्याची व रडण्याची वेळ नव्हती. आता प्रार्थना करण्याची आणि कृती करण्याची वेळ होती. *परमेश्वरा! आम्हाला तिथे पोहोचू दे. आम्हाला आमच्या मुलाला मदत करू दे!*

कोल्टनचे 'वडील' असून मला वाटतं मीच घोळ घातला, पण अजूनही मी काहीतरी करू शकत होतो. त्याची भरपाई करू शकत होतो. केवळ ही आशा मनात असल्यामुळेच मी तुटून गेलो नव्हतो.

दुपारी आम्ही नॉर्थ प्लेटची सीमा ओलांडली आणि थेट डॉक्टरांच्या ऑफिसचा रस्ता पकडला. मी गाडीतून चट्कन उतरून ब्लँकेटमध्ये गुंडाळलेल्या कोल्टनला एखाद्या अग्निशामक दलातल्या जवानासारखं खांद्यावर घेतलं. सोनयानं आमचं सामान गोळा केलं आणि ती माझ्या मागोमाग धावली. तिच्या हातात अजूनही हॉस्पिटलचं भांडं होतं.

स्वागतकक्षातील टेबलाजवळ एका हसतमुख स्त्रीनं आम्हाला अभिवादन केलं.

''आम्ही बर्पो कुटुंबीय आहोत,'' मी म्हणालो, ''आम्ही आधीच इम्पीरिअलमधून आमच्या मुलासाठी फोन केला होता.

''डॉक्टर जेवणासाठी गेले आहेत.''

*जेवणासाठी गेलेत?*

मी म्हणालो, ''पण आम्ही आधीच फोन केला होता. आम्ही येणार हे

त्यांना माहीत आहे.''

''प्लीज, जरा बसा!'' स्वागतकक्षातील त्या स्त्रीनं विनंती केली.

''डॉक्टर, अगदी दहा-पंधरा मिनिटांत येतील.''

तिच्या वागण्यातील सरावाच्या पद्धतीवरून मला कळलं की, तिला आमची निकड कळली नव्हती. मी आतल्या आत एखाद्या अग्निबाणाप्रमाणे पेटून उठलो. परंतु बाह्यतः अगदी शांत राहिलो. मला मोठमोठ्याने किंचाळावं, रडावं असं वाटत होतं. पण त्यामुळे काही चांगलं घडलं नसतं. शिवाय मी एक धर्मोपदेशक आहे. लोकांच्या समोर तसं वागणं आम्हाला परवडणार नाही.


सोनया आणि मी वेटिंगरूममध्ये बसलो. पंधरा मिनिटांनी डॉक्टर आले. त्यांचं परिपूर्ण व्यक्तिमत्त्व आश्वासक वाटलं– रुपेरी केस, चश्मा, लहानशी मिशी. हॉस्पिटलच्या सेवक वर्गानं आम्हाला लगेच तपासणीच्या खोलीत नेलं. सोनयानं आम्ही बरोबर आणलेले पेपर्स आणि एक्स-रे त्यांना दिले. त्यांनी कोल्टनला अगदी थोडा वेळ तपासलं. मला वाटतं ते फुकट गेलेला वेळ भरून काढत होते.

''मला वाटतं, सीटीस्कॅन करावा लागेल.'' ते म्हणाले, ''तुम्ही रस्ता ओलांडून पलीकडे हॉस्पिटलमध्ये जा.''

ते म्हणत होते ते ग्रेट प्लेन्स रीजनल मेडिकल सेंटर. दहा मिनिटांनी आम्ही एक्स-रे काढण्याच्या खोलीत होतो. त्या वेळी आमच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा आणि कठीण वादविवाद घडणार होता.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




**७वी आवृत्ती**

**धीरुभाईझम**

लेखिका : **ए. जी. कृष्णमूर्ती** । अनुवाद : **सुप्रिया वकील**

भव्य स्वप्नपूर्तीसाठी स्वत:च्या खास कार्यविषयक तत्त्वज्ञानातून उद्योग व्यवस्थापनात एक नवं आदर्श पाऊल टाकणारं...

**किंमत : ९५/-रु. । पोस्टेज अतिरिक्त । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय



# अशक्य भौतिकी



मिचिओ काकू हे न्यू यॉर्कचे रहिवासी आहेत. न्यू यॉर्क येथील 'ग्रॅज्युएट सेंटर ऑफ द सिटी युनिव्हर्सिटी'मध्ये 'हेन्री सीमॅट' थिऑरॉटिकल फिजिक्सचे प्रोफेसर आहेत. (हेन्री सीमॅट यांच्या नावाने त्या विद्यापीठात असलेली मानाची जागा ते भूषवतात.) 'स्ट्रिंग फिल्ड थिअरी' या सुप्रसिद्ध सिद्धान्ताचे ते सहनिर्माते आहेत. त्यांनी 'पॅरलल वर्ल्ड्स', 'बियाँड आईनस्टाइन'आणि त्यांचे बेस्ट सेलर 'हायपरस्पेस' अशी बरीच पुस्तके लिहिली आहेत. 'हायपरस्पेस' या पुस्तकाला 'वॉशिंग्टन पोस्ट' आणि 'न्यू यॉर्क टाइम्स' यांच्या तर्फे त्या वर्षीचे विज्ञाना-संबंधीचे उत्कृष्ट पुस्तक म्हणून मान्यता मिळाली होती. राष्ट्रीय दूरचित्रवाणीवर त्यांची वारंवार उपस्थिती असते. राष्ट्रीय स्तरावर अनेकांच्या सहकार्याने चालणारे त्यांचे आकाशवाणीवरचे कार्यक्रमही १३० शहरांमध्ये ऐकले जातात.




**मिचिओ काकू**

अनुवाद
**लीना दामले**

*'अशक्य भौतिकी' या पुस्तकात सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ मिचिओ काकू यांनी विज्ञानकथांमधील काल्पनिक उच्च तंत्रज्ञान आणि यंत्रे, जी आजच्या काळात अशक्य वाटत आहेत, ती कुठल्या मर्यादेपर्यंत, उद्याच्या भविष्यात नेहमीच्या रोजच्या वापरातल्या गोष्टी होऊ शकतात, याबद्दल विवेचन केलं आहे. उदा. प्रकाशाला एखाद्या वस्तूभोवती वाकवणे, जवळपासच्या ताऱ्यापर्यंत प्रवास करणे सर्वसामान्य माणसाला शक्य होणे इ. आज आपल्याला माहिती असलेल्या भौतिकशास्त्राच्या नियमांचा महत्त्वाचा भाग आणि त्याच्या मर्यादांबद्दलचं संशोधन करण्यासाठी त्यांनी विज्ञानकथांच्या विश्वाचा, अगदी टेलिपोर्टेशनपासून ते टेलिकायनेसिसपर्यंत वेध घेतला आहे. एकूण, 'अशक्य भौतिकी' हे एक विलक्षण असं शास्त्रीय साहस आहे, जे वाचकांना एका अविस्मरणीय आणि भुरळ पाडणाऱ्या अशा शास्त्रीय जगताच्या सफरीवर घेऊन जातं, ज्यातून तुम्हाला अद्‌भुत असा बोधही होतो आणि करमणूकही होते.*

(‘अशक्य भौतिकी’ पुस्तकातून)

# अदृश्यता

तुमची कल्पनाशक्ती धूसर होते, तेव्हा तुम्ही तुमच्याच डोळ्यांवर विश्वास ठेवू शकत नाही.

**– मार्क ट्वेन**

स्टारट्रेक-४ या चित्रपटात ‘एन्टरप्राइज’च्या चमूने ‘व्हॉएज होम’ या क्लिंगन युद्धनौकेचं अपहरण केलं. क्लिंगन साम्राज्याच्या अंतरिक्ष यानांमध्ये एक अशी गुप्त यंत्रणा आहे की, (क्लोनिंग डिव्हाइस) ज्या योगे ते स्वत:भोवती एक आवरण तयार करते. दृश्य प्रकाश किंवा रडारच्या लहरी त्याला भेदू शकत नाहीत. त्यांच्यासाठी यान अदृश्य राहते. ही यंत्रणा फेडरेशन स्टार फ्लीटच्या अंतरिक्ष यानांमध्ये नाही. त्या यंत्रणेमुळे क्लिंगन अंतरिक्ष याने फेडरेशन स्टारशिप्सच्या पिछाडीकडून गुपचूप पण सहज हल्ला करू शकतात. या गुप्त यंत्रणेमुळे क्लिंगन साम्राज्याला फेडरेशन ऑफ प्लॅनेट्सवर कुरघोडी करण्यासाठी लष्करी डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा गाठता आला आहे.

(स्टारट्रेक : स्टारट्रेक ही १९६० च्या दशकात प्रक्षेपित केली गेलेली प्रसिद्ध अशी मालिका आहे. स्टारट्रेकचे कथानक एन्टरप्राइज या अंतराळयानाचा आणि त्यावरील कर्मचारी दलाचा प्रवास व त्यांची धाडसे यांवर आधारित आहे. एन्टरप्राइज हे अवकाशयान आपल्या आकाशगंगेत (the milky way galaxy) मानवी वसाहतीस योग्य ग्रहांचा शोध घेण्यासाठी तेविसाव्या शतकात धाडले गेले आहे, असे मालिकेत दाखवले आहे. कथानक तेविसाव्या शतकातील असल्यामुळे त्यात काही प्रगत कल्पना मांडल्या गेल्या आहेत. त्यातल्या ऊर्जाक्षेत्रे (फोर्स फिल्ड्स), दूरप्रेषण (टेलिपोर्टेशन) इत्यादी कल्पनांमागच्या शास्त्राचे स्पष्टीकरण पुस्तकात आहे.)

अशी यंत्रणा प्रत्यक्षात शक्य आहे का? ‘अदृश्यता’ ही विज्ञान काल्पनिकांमधील एक अद्भुत, नवलाईची गोष्ट आहे; जिचा उल्लेख अगदी ‘द इनव्हिजिबल मॅन’ या पुस्तकापासून ते आताच्या ‘हॅरी पॉटर’च्या पुस्तकांमधील अदृश्य करणारा जादूचा कोट किंवा ‘लॉर्ड ऑफ रिंग्ज’मधल्या जादूच्या अंगठीपर्यंत होतो; परंतु गेल्या शतकापासून भौतिक

शास्त्रज्ञांनी अशा प्रकारच्या अदृश्यता देववणाऱ्या जादूच्या कोटाच्या अस्तित्वाची शक्यता फेटाळून लावली आहे. त्यांच्या मते, ही अशक्य गोष्ट आहे. दृक्शास्त्राचे (ऑप्टिक्सचे) नियम त्यामुळे धाब्यावर बसवल्यासारखे होईल. पदार्थाच्या गुणधर्माच्या कुठल्याही नियमात ते बसत नाही.

पण आजच्या जमान्यात अशक्य ते शक्य करण्याची धमक आहे. 'मेटामटेरियल्स'च्या क्षेत्रातील नवनवीन संशोधनांमुळे दृक्शास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमध्ये नव्याने बदल घडण्याची शक्यता आहे. अशा प्रकारचे प्रोटोटाइप आताच्या प्रयोगशाळांमध्ये तयार होत आहेत. दृश्य आहे ते अदृश्य करण्याच्या प्रयोगांना विविध माध्यमे, कारखाने, उद्योग आणि लष्कराकडून जोरदार पाठिंबा मिळत आहे.

अदृश्यतेबद्दलचे ऐतिहासिक उल्लेख

पुराणकथांमधील अदृश्यता ही बहुतेक अगदी प्राचीनतम कल्पना असावी. आतापर्यंतच्या लिखित स्वरूपातील उपलब्ध इतिहासात असे अनेक उल्लेख सापडतात, ज्यांमध्ये अंधाऱ्या रात्री भयाण एकाकी अवस्थेतील माणसाला काल्पनिक अदृश्य अशा भुतांनी किंवा मेलेल्या माणसांच्या अदृश्य आत्म्यांनी घाबरवून सोडलं आहे. ग्रीक योद्धा पर्सिअस अदृश्यतेचे हत्यार वापरूनच मेडुसा राक्षिशिणीचे निर्दालन करू शकला. अदृश्य करणारा जादूचा कोट हे लष्कराच्या अधिकाऱ्यांचे अथवा सेनाधिकाऱ्यांचे लाडके स्वप्न असेल. अदृश्य झाल्यामुळे शत्रूची आघाडीची फळी मोडून त्यांच्यामध्ये घुसून त्यांच्यावर मात करणे किती सोपे होईल! गुन्हेगारांना तर मोठमोठे दरोडे घालण्यासाठी प्रभावी अस्त्रच उपलब्ध होईल.

प्लेटोच्या नीतिमत्ता व सदाचाराच्या सिद्धान्तांमध्ये अदृश्यतेने मध्यवर्ती भूमिका बजावली आहे. त्याच्या 'द रिपब्लिक' या आध्यात्मिक विषयावरच्या उत्कृष्ट कलाकृतीमध्ये 'रिंग ऑफ गाइग्ज' ही पुराणकथा प्लेटो कथन करतो. लीडियातील गाइग्ज नावाचा एक गरीब पण प्रामाणिक गुराखी एकदा एका गुप्त गुहेत शिरतो. तिथे त्याला एक थडगे दिसते. त्या थडग्यातील प्रेताच्या हाताच्या बोटामध्ये एक सोन्याची अंगठी असते. गाइग्जला असा शोध लागतो की, त्या अंगठीमध्ये त्याला अदृश्य करण्याची जादू आहे. थोड्याच काळात त्या जादूच्या अंगठीमुळे मिळणाऱ्या शक्तीने त्या गरीब गुराख्याला उन्माद चढतो, तो उन्मत्तपणे वागू लागतो. त्या भरात तो राजाच्या

राजवाड्यात गुप्तपणे शिरतो आणि आपली जादूई शक्ती वापरून राणीला वश करून घेतो. मग तिच्याच मदतीने राजाचा खून करतो आणि स्वत: लीडियाचा राजा बनतो.

प्लेटो सांगू इच्छित असलेल्या गोष्टीचे तात्पर्य हेच की, कुठलाही माणूस त्याच्या मनाला वाटेल तसा चोरी करणे किंवा कोणाची हत्या करणे या कृत्यांचा मोह टाळू शकत नाही. सगळीच माणसं कमकुवत मनाची असतात. नीतिमत्ता हे बाहेरून लादलेले बंधन आहे. आपली तत्त्वनिष्ठ व प्रामाणिक अशी प्रतिमा जपण्यासाठी माणूस सदाचाराचे, नीतिमत्तेचे कातडे पांघरू शकतो; पण एकदा का त्याच्या हाती अदृश्यतेची शक्ती आली की, ती वापरण्यापासून तो स्वत:ला रोखणं अशक्य. किंबहुना ती शक्ती न वापरणं अशक्यच. (काहींचं म्हणणं असंही आहे की, जे. आर. आर. टोलकिन्सच्या 'लॉर्ड ऑफ द रिंग्ज' या तीन भागांत असलेल्या कादंबरीची (ट्रायलॉजीची) मूळ प्रेरणा ही नीतिमत्तेची गोष्टच आहे. त्या गोष्टीत ती अंगठी– जी घालणाऱ्याला अदृश्य करते– तीच पापाचे मूळ आहे.)

त्यामुळेच की काय, विज्ञान काल्पनिकांच्या (सायन्स फिक्शन) बहुतांश कथानकांचे बीज 'अदृश्यता' हेच असते. यामध्ये 'फ्लॅश गार्डन' ही मालिका सर्वांत जुनी म्हणजे १९३० मधील आहे. त्यातही अदृश्यतेचा आधार घेऊनच 'मिंग द मर्सिलेस'च्या गोळीबार करणाऱ्या तुकडीपासून फ्लॅश स्वत:चे रक्षण करतो. एवढेच कशाला, आताच्या हॅरी पॉटरच्या कादंबऱ्या आणि चित्रपटांमध्येही, हॅरी जादूचा अदृश्य करणारा कोट घालूनच कोणालाही न दिसता साऱ्या हॉगवर्टमध्ये हिंडून येतो.

एच. जी. वेल्सने आपल्या 'इनव्हिजिबल मॅन' या उत्कृष्ट कादंबरीमध्ये या पुराणकथांचा भरभक्कम उपयोग करून घेतला आहे; ज्यात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला अपघाताने चौथ्या मितीचा शोध लागतो. ती कल्पना वापरून तो अदृश्य होतो; परंतु दुर्दैवाने तो ती कल्पना स्वार्थासाठी, खासगी कामासाठी वापरतो. त्यातून छोटे-छोटे गुन्हे करत अखेर पोलिसांना चुकवता-चुकवता मरणाच्या दारात पोहोचतो.

मॅक्सवेलची समीकरणे व प्रकाशाचे रहस्य

१९ व्या शतकातील विलक्षण बुद्धीचा स्कॉटिश शास्त्रज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेल याच्या संशोधनानंतरच भौतिक शास्त्रज्ञांना दृक्शास्त्राच्या (ऑप्टिक्स) नियमांचे नीट आकलन झाले. मॅक्सवेल हा काही प्रमाणात

मायकेल फॅरॅडेपेक्षा वेगळा होता, असे म्हणता येईल. फॅरॅडेला शास्त्रीय प्रयोगांबद्दलचे उपजतच ज्ञान होते; पण त्यांचे रीतसर शिक्षण झालेले नव्हते; तर त्यांच्याच समकालीन असलेला मॅक्सवेल गणित या विषयातला फार मोठा तज्ज्ञ होता. केंब्रिज विद्यापीठातील गणित, भौतिकी शास्त्राचा विद्यार्थी म्हणून तो चमकलेला होता. त्या विषयावर त्याचं प्रभुत्व होतं. याच विद्यापीठात दोन शतकांपूर्वी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आयझॅक न्यूटनने त्याच्या संशोधनाचं काम केलं होतं.

न्यूटनने डिफरन्शियल इक्वेशन्स (डी.ई) च्या भाषेत समजावलेल्या मापनपद्धतीचा (कॅलक्युलसचा) शोध लावला. अवकाशकालामध्ये एखाद्या वस्तूमध्ये हळुवारपणे अतिसूक्ष्म बदल कसे होतात, ते यांच्या मदतीने वर्णन करता येतात. सागराच्या लाटांची द्रवपदार्थांची, वायूची किंवा तोफगोळ्याची गती हे सर्व डी.ईच्या भाषेत सांगता येते. फॅरॅडेच्या क्रांतिकारी शोधांचे आणि त्याच्या फोर्स फिल्ड्सचे वर्णन डी.ईच्या भाषेत जगाला समजावून सांगणे, हेच मॅक्सवेलने त्याचे ध्येय ठरवले होते.

विद्युतभारित क्षेत्र आणि चुंबकीय क्षेत्र आपसात बदलू शकतात, या फॅरॅडेच्या संशोधनापासूनच मॅक्सवेलने सुरुवात केली. फॅरॅडेच्या फोर्स फिल्डची रेखाटने घेऊन मॅक्सवेलने ती डी. ई च्या भाषेत मांडली. ती समीकरणे म्हणजे आधुनिक विज्ञानातील अतिशय महत्त्वाची पण तितकीच कठीण अशी आठ समीकरणांची मालिका आहे. जगातील प्रत्येक भौतिक शास्त्रज्ञाला व इंजिनिअरला या समीकरणांसाठी घाम गाळावा लागतो. त्याशिवाय पदवी पदरात पडत नाही.




४थी आवृत्ती

मृत्यू... माझ्या उंबरठ्याशी

लेखक : **खुशवंत सिंग** | अनुवाद : **सुप्रिया वकील**

मृत्यूबद्दल सर्वकाही... अस्वस्थ करणारे...
अंतर्मुख करणारे...दिपवणारे आणि हसवणारेही...

**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज : ५०/- रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

यानंतर मॅक्सवेलने स्वत:ला जो निर्णायक प्रश्न विचारला, तो म्हणजे– चुंबकीय क्षेत्र विद्युत क्षेत्रात व विद्युत क्षेत्र चुंबकीय क्षेत्रात बदलू शकते. समजा, जर ही क्रिया सतत चालू राहिली– कधीही न थांबता– तर काय होईल? मॅक्सवेलच्या असे लक्षात आले की, ही विद्युतचुंबकीय क्षेत्रे एखाद्या सागरातील लाटांसारख्या एक प्रकारच्या लहरी तरंग निर्माण करतात. त्या तरंगांची गती मोजल्यावर त्याच्या असे लक्षात आले की, ती गती प्रकाशाच्या गतीएवढी आहे! सन १८६४ मध्ये लागलेल्या या शोधानंतर मॅक्सवेलने असे भाष्य केले की– 'या तरंगांची गती प्रकाशाच्या गतीशी एवढी मिळतीजुळती आहे की, आपण निश्चितपणे असे म्हणू शकतो की– प्रकाश हा स्वत:च एक विद्युतचुंबकीय तरंग आहे.'

मानवाच्या इतिहासातील तो सगळ्यात मोठा आणि महत्त्वाचा असा शोध होता. प्रकाशाच्या लहरींचे गुपित पहिल्यांदाच जगासमोर येत होते. मॅक्सवेलच्या एकाएकी असे लक्षात आले की, सूर्योदयाच्या वेळचे तेज, सूर्यास्ताच्या वेळचा झगझगीत प्रकाश, इंद्रधनुष्याचे दिपवून टाकणारे रंग, ताऱ्यांनी भरलेले आकाश या सगळ्यांचे वर्णन तो कागदावर चितारत असलेल्या तरंगांच्या साह्याने करता येणे शक्य आहे. आज आपल्याला हे समजतयं की, संपूर्ण विद्युतचुंबकीय वर्णपट, रडारपासून टीव्ही, इन्फ्रारेड (अवरक्त किरण), दृश्य प्रकाश, अल्ट्राव्हायोलेट (अतिनील किरण), एक्सरेज, मायक्रोवेव्हज, गॅमारेजपर्यंत सर्व काही मॅक्सवेल तरंग आहेत. दुसऱ्या भाषेत बोलायचे झाल्यास, ती फॅरॅडेची कंप पावणारी अशी 'फोर्स फिल्ड्स' आहेत.

मॅक्सवेलच्या समीकरणांच्या महत्तेबद्दल भाष्य करताना आइन्स्टाईन लिहितो की, 'न्यूटननंतर भौतिकशास्त्राने अनुभवलेली अतिशय सखोल, फलदायी व फायदेशीर अशी ही समीकरणे आहेत.'

मॅक्सवेल हा १९ व्या शतकातील सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञांपैकी एक असलेला शास्त्रज्ञ. दुर्दैवाने वयाच्या केवळ ४८ व्या वर्षी पोटाच्या कॅन्सरने तो मृत्यू पावला. बहुतेक त्याच आजाराने त्याची आई तेवढ्याच वयाची असताना मरण पावली होती. मॅक्सवेल जर जास्त जगता, तर कदाचित त्याने हेही शोधले असते की, त्याची समीकरणे अवकाशकालातल्या बदलाला मान्यता देऊ शकतात, जी शेवटी आइन्स्टाईनच्या सापेक्षतेच्या सिद्धान्ताकडे अंगुलीनिर्देश करतात. मॅक्सवेल जास्त जगला असता, तर

अमेरिकन सिव्हिल वॉरच्या काळातच सापेक्षतेच्या सिद्धान्ताचा शोध लागला असता– हा विचारच चक्रावून टाकणारा आहे.

मॅक्सवेलचा प्रकाशाचा सिद्धान्त आणि अणुचा सिद्धान्त हे दृकशास्त्र व अदृश्यतेवर पूर्ण प्रकाश टाकू शकतात. घनपदार्थामध्ये त्यातील अणू एकमेकांशी घट्टपणे जोडलेले असतात, तर द्रव अथवा वायूरूप पदार्थांमध्ये परमाणू विरळपणे पसरलेले असतात. बहुतेक सर्व घनपदार्थ अपारदर्शक असतात. घनपदार्थातील दाटीवाटीने असलेल्या अणुंच्या रचनेमुळे जणू एक विटांची भिंतच तयार होते आणि त्यातून प्रकाशकिरण आरपार जाऊ शकत नाहीत. त्याच्या विरुद्ध अनेक द्रवपदार्थ व वायू पारदर्शक असतात, कारण त्यांच्या दोन अणुंमध्ये असलेल्या मोकळ्या जागेतून प्रकाशकिरण सहजपणे जाऊ शकतात. प्रकाशकिरणांच्या तरंगलांबीपेक्षा त्या दोन अणुंमधील अंतर जास्त असते. उदाहरणार्थ – पाणी, अल्कोहोल, अमोनिया ॲसिटोन, हायड्रोजन, नायट्रोजन, कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन इ. वायूसुद्धा पारदर्शक आहेत.

या नियमाला काही सणसणीत अपवादही आहेत. बरेचसे स्फटिक घनरूप असूनही पारदर्शक असतात, कारण स्फटिकातील अणू विशिष्ट अशा जाळीदार रचनेत बद्ध असतात– नियमित अशा ओळीमध्ये व ठरावीक अंतरावर; त्यामुळे एखाद्या स्फटिकाच्या जाळीदार रचनेतून अनेक मार्गांनी प्रकाशाचे किरण पार जाऊ शकतात. म्हणूनच जरी एखादा स्फटिक घनपदार्थासारखा असला, म्हणजे त्यातील अणू दाटीवाटीने एकमेकांना चिकटून असले तरी त्यातून प्रकाशकिरण आरपार जाऊ शकतात.

काही विशिष्ट अशा परिस्थितीत घनपदार्थ पारदर्शक होऊ शकतो; जर त्यातील अणू विशिष्ट अशा पद्धतीने रचलेले असतील तर घनपदार्थ पारदर्शक करण्यासाठी विशिष्ट वस्तूंना उष्णता देऊन एकाएकी थंड करावे लागते. उदा– काच. काचेमध्ये द्रवपदार्थाचे अनेक गुणधर्म असतात; कारण त्यातील अणुंची रचना नियमानुसार नसते, वेडीवाकडी कशीही असते. काही प्रकारच्या खाऊच्या गोळ्या अशा तऱ्हेने पारदर्शक करता येतात.

मॅक्सवेलच्या समीकरणांचा उपयोग करून एक गोष्ट स्पष्ट होते की, अदृश्यता हा गुणधर्म अतिसूक्ष्म पातळीवर, म्हणजे आण्विक पातळीवर उगम पावणारा आहे आणि म्हणूनच कृत्रिमरीत्या अदृश्यता निर्माण करणे (म्हणजे वस्तू अदृश्य करणे) अगदी अशक्य नसले, तरी अतिशय अवघड

मात्र नक्की आहे. हॅरी पॉटरला अदृश्य करण्यासाठी पहिल्यांदा त्याला द्रवरूपामध्ये आणावे लागेल, मग त्याची वाफ करण्यासाठी त्याला उकळावे लागेल, मग त्याचे स्फटिकीकरण करून त्याला तापवून थंड करावे लागेल. एखाद्या चेटकिणीला अथवा एखाद्या जादूगारालाही असे करता येणे शक्य नाही.

लष्कराला अदृश्य विमाने तयार करणे जमले नाही; परंतु त्यावर उपाय म्हणून त्यातल्या त्यात 'स्टेल्थ' तंत्रज्ञान वापरून विमाने रडारसाठी अदृश्य करण्याची कामगिरी त्यांनी करून दाखवली आहे. हे स्टेल्थ तंत्रज्ञान आणि त्याच्या विविध करामती मॅक्सवेलच्या समीकरणांवर अवलंबून आहेत. स्टेल्थ लढाऊ जेट विमाने माणसांच्या डोळ्यांना व्यवस्थित दिसू शकतात, पण त्यांची रडार इमेज मात्र शत्रूच्या रडारपडद्यावर एखाद्या मोठ्या पक्ष्याएवढीच दिसते. स्टेल्थ तंत्रज्ञान म्हणजे प्रत्यक्षात वेगवेगळ्या करामतींचे मिश्रण आहे. (उदा.– लढाऊ जेट विमानातील काही भाग वेगवेगळ्या धातूंपासून बनवले जातात, त्यात स्टीलचा कमीतकमी उपयोग करून त्याऐवजी प्लॅस्टिक अथवा राळ (रेझीन) वापरणे, विमानाच्या मुख्य भागाचा कोन बदलणे, एग्झॉस्ट पाइप्सची पुनर्रचना करणे इ. शत्रूचे रडारकिरण अशा तऱ्हेने पडतील अशी व्यवस्था करायची की, ते किरण परतून शत्रूच्या रडारपडद्यापर्यंत न पोहोचता वेगवेगळ्या दिशांनी निघून जातील. अर्थात या स्टेल्थ तंत्रज्ञानाने ही लढाऊ जेट विमाने शत्रूच्या रडारपडद्यावरून संपूर्णपणे नाहीशी होऊ शकत नाहीत, पूर्णपणे अदृश्य होत नाहीत; पण त्यांचे चित्र रडारवर जास्तीतजास्त वेडेवाकडे पसरलेले दिसेल, असा प्रयत्न केला जातो.)

◆





२४वी आवृत्ती

ही वाट एकटीची वपु काळे

जीवनाविषयीचं कठोर तत्त्वज्ञान सांगणारी
व. पुं. ची पुरस्कारप्राप्त प्रथम कादंबरी

किंमत : १५०/-रु. । पोस्टेज : ५०/- रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

## नवीन प्रकाशने



कथात्म साहित्यातील अजब रसायन असणाऱ्या 'नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी'मधील रंजक पुष्प.. बोट्स्वाना देशातील पहिली स्त्री गुप्तहेर मॅडम रामोत्स्वेचे दिलखुलास कारनामे

### द फुल कबर्ड ऑफ लाइफ

लेखक : ॲलेक्झांडर स्मिथ । अनुवाद : नीला चांदोरकर

---




अध्यात्माची नवी मांडणी करताकरताच संन्याशांच्या श्रेणीव्यवस्थेतील भयावह संदर्भ मांडणारी.. आणि श्रद्धेच्या बाजारातल्या मिथकातून अद्‌भुत कलाविष्कार घडवणारी.. गुंतागुंतीच्या रहस्यांची अफलातून मांडणी..

### सँक्टस

लेखक : सायमन टॉएन । अनुवाद : उदय भिडे

---




इस्पितळाच्या भिंतीआड घडणाऱ्या गोष्टींचे बारकावे टिपत स्वास्थ्यजाणीव वाढवणारं पथदर्शक पुस्तक...

### बेटर

लेखक : डॉ. अतुल गवांदे । अनुवाद : सुनीति काणे

---




वाचकाला कोड्यात टाकणारा विलक्षण सस्पेन्स फॅक्टर आणि भयनिर्मितीचं अफाट कौशल्य असणारा मराठी गूढकथेचा नवा बाज..

### मगरडोह

लेखक : शशिकांत वामन काळे

# पुस्तक परिचय



# घणघणतो घंटानाद



विसाव्या शतकातील श्रेष्ठ अमेरिकन कथा-कादंबरीकार अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्म अमेरिकेतील इलिनॉय राज्यातील ओक पार्क येथे झाला. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी 'कान्सास सिटी स्टार' या वृत्तपत्रात वार्ताहर म्हणून कामास सुरुवात केली. १९२५मध्ये त्यांचे मिशिगनमधील बालपणीच्या अनुभवांवर आधारित पहिले महत्त्वाचे पुस्तक 'इन अवर टाइम' प्रकाशित झाले. 'द सन ऑल्सो राइझेस', 'अ फेअरवेल टू आर्म्स' या पहिल्या महायुद्धावर आधारित कादंबऱ्या, 'टू हॅव अँड हॅव नॉट' ही आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी, 'फॉर हूम द बेल टोल्स' ही स्पॅनिश यादवी युद्धावर आधारित महाकाव्यसदृश कादंबरी इ. कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'द ओल्ड मॅन अँड द सी' ही त्यांची सर्वोत्कृष्ट कादंबरी मानली जाते. त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. १९५४मध्ये अर्नेस्ट हेमिंग्वे यांना साहित्यातील सर्वाधिक मानाचे नोबेल पारितोषिक मिळाले.




**अर्नेस्ट हेमिंग्वे**

अनुवाद
**दि. बा. मोकाशी**

*स्पेनमधील पाईन वृक्षराजींनी वेढलेल्या*
*पर्वतरांगांतील घनगर्द जंगलात स्थानिक गॉरिलांच्या मदतीसाठी*
*एक महत्त्वाचा पूल उडविण्याची योजना आखली जाते.*
*अनुभवी सुरुंगउडव्या आणि फॅसिस्टांविरुद्ध लढणाऱ्या*
*रॉबर्ट जॉर्डनची या कामगिरीसाठी निवड होते.*
*तिथे त्या डोंगराळ भागामध्ये त्याला*
*युद्धजन्य परिस्थितीच्या धोक्याची चाहूल लागते.*
*या प्रवासादरम्यानच फ्रांकोच्या बंडखोरांच्या*
*तावडीतून सुटलेली मेरिया त्याच्या आयुष्यात दाखल होते.*
*‘फॉर हूम द बेल टोल्स’ ही हेमिंग्वेची एक उत्कृष्ट कादंबरी आहे.*
*जी स्पेनचे विभाजन करणाऱ्या नागरी युद्धाची दुःखद व्यथा मांडते.*

('घणघणतो घंटानाद' पुस्तकातून)

वरच्या कुरणावरून उतरून ते खालच्या दरीतल्या झाडीत आले. तेथून ओढ्याला समोर असलेल्या पायवाटेनं ते वर चढले. पुन्हा डावीकडे वळून चढणीवरून कातळाकडे गेले. अजूनही ते झाडांच्या सावल्यांमधूनच चालत होते. तेवढ्यात बंदूक घेतलेला एक माणूस झाडामागून पुढे आला.

''थांबा!'' तो म्हणाला. मग म्हणाला, ''वा! पिलर का? हा कोण आहे तुझ्याबरोबर?''

''एक इंग्लिश,'' पिलर म्हणाली, ''पण नाव ख्रिश्चन आहे. रॉबर्टो. इथं यायचं म्हणजे साला किती चढ आहे!''

''नमस्ते कॉम्रेड!'' पहारेकरी रॉबर्ट जॉर्डनला म्हणाला. त्यानं हात पुढे केला नि म्हटलं, ''कसं काय?''

''ठीक!'' रॉबर्ट जॉर्डन म्हणाला, ''तुमचं?''

''तसंच,'' पहारेकरी म्हणाला. तो पोरगेला होता. बांधा हलका होता. अंगानं सडपातळ होता. नाक गरुडासारखं, गालाची हाडं वर आलेली नि डोळे घारे होते. त्यानं हॅट घातली नव्हती. त्याचे केस काळे, विस्कटलेले होते. त्याच्या हाताची पकड कडक असून तीत सद्भाव होता. त्याच्या डोळ्यांतही सद्भाव होता.

''नमस्ते, मेरिया!'' तो मेरियाला म्हणाला, ''तू थकलीबिकली नाहीस ना?''

''कसलं थकणं, जोकीन!'' मेरिया म्हणाली, ''आम्ही चाललो त्याहून बसलोच जास्त.''

''सुरुंगउडवे तुम्हीच का?'' जोकीननं विचारलं. ''तुम्ही आल्याचं आम्ही ऐकलं.''

''आम्ही पाब्लोकडे रात्र काढली,'' रॉबर्ट जॉर्डन म्हणाला, ''हो! मीच तो सुरुंगउडव्या–''

''तुम्ही आलात– आनंद झाला,'' जोकीन म्हणाला.

''गाडीचं काम घेऊन आलात काय?''

''गेल्या गाडीच्या वेळी तुम्ही होता?'' रॉबर्ट जॉर्डननं विचारलं नि हसला.

''मी होतो?'' जोकीन म्हणाला, ''मग हे कुठून आलं?'' मेरियाकडे

पाहून तो हसला. तो मेरियाला म्हणाला, ''आता सुंदर दिसू लागली आहेस तू. कुणी म्हटलं नाही तुला?''

''गप्प बस, जोकीन!'' मेरिया म्हणाली, ''केस कापलेस तर तूही सुंदर दिसशील.''

''मी तुला नेलं– तुला या खांद्यावरून नेलं!'' जोकीन म्हणाला.

''इतरांनीही नेलं,'' पिलर खोल आवाजात म्हणाली, ''कुणी नेलं नाही तिला? यजमान कुठं आहे?''

''कॅम्पात.''

''काल रात्री कुठं होता?''

''सेगोव्हियात.''

''काही बातमी?''

''हो,'' जोकीन म्हणाला, ''बातमी आहे.''

''चांगली की वाईट!''

''मला वाटतं, वाईट!''

''विमानं पाहिलीत?''

''हो!'' जोकीन म्हणाला. त्यानं मान हलवली, ''तो विषय काढू नका. सुरुंगवाले दोस्त, कोणती विमानं होती ती?''

''हँकेल वन एलेव्हन बॉम्बर्स. हँकेल नि फियाट परसुट.'' रॉबर्ट जॉर्डननं सांगितलं.

''पडत्या पंखांची मोठी विमानं कोणती होती?''

''हँकेल वन एलेव्हन्स.''

''नावं काही असोत, ती वाईट होती,'' जोकीन म्हणाला, ''तुम्हाला उशीर करतोय मी. कमांडरकडे तुम्हाला नेतो.''

''कमांडर?'' पिलरनं विचारलं.

जोकीन गंभीरपणे म्हणाला, ''नायकापेक्षा ते मला आवडतं. ते जास्त सैनिकी वाटतं.''

''तुझं फार सैनिकीकरण होतंय,'' पिलर म्हणाली नि हसली.

''नाही,'' जोकीन म्हणाला, ''मला सैनिकी संज्ञा आवडतात. त्यांनी हुकमात स्पष्टपणा येतो नि जास्त शिस्त लागते.''

''इंग्लिशा, तुझ्या आवडीचा एक भेटला,'' पिलर म्हणाली, ''पक्का

गंभीर माणूस.''

''तुला उचलून नेऊ का?'' जोकीननं मुलीला विचारलं. त्यानं तिच्या खांद्यावर हात ठेवला नि तिच्याकडे पाहून हसला.

''एकदा नेलंस तेवढं पुरे,'' मेरिया म्हणाली, ''काही असलं तरी उपकार मानते त्याबद्दल.''

''तुला आठवतंय?'' जोकीननं विचारलं.

''मला उचलून नेलेलं आठवतंय,'' मेरिया म्हणाली, ''पण तू उचललेलं? नाही. मला जिप्सी आठवतो. कारण त्यानं मला खूपदा पाडलं. पण तरी तुझे उपकार झाले. केव्हातरी तुला उचलून परतफेड करीन.''

''मला ते चांगलं आठवतंय,'' जोकीन म्हणाला, ''तुझ्या दोन्ही तंगड्या धरलेल्या– तुझं पोट माझ्या खांद्यावर– तुझं डोकं माझ्या पाठीवर– तुझे हात माझ्या पाठीला टांगलेले.''

''तुला फार स्मरणशक्ती आहे,'' मेरिया म्हणाली नि त्याच्याकडे पाहून हसली. ''मला ते काहीच आठवत नाही. तुझे हातही आठवत नाहीत. खांदेही नाहीत. पाठही नाही.''

''तुला आवडेल का सांगितलेलं?'' जोकीननं विचारलं.

''काय?''

''मागून गोळ्या येत होत्या, तेव्हा तू माझ्या पाठीवर होतीस. त्यानं मला इतकं बरं वाटलं तेव्हा.''

''काय हलकट आहे मेला!'' मेरिया म्हणाली, ''यासाठीच का जिप्सीनंही मला उचललं?''

''हो, त्यासाठीच. शिवाय तुझे पाय धरायला मिळाले.''

''वा रे माझे शूर!'' मेरिया म्हणाली, ''वा रे माझे तारणकर्ते!''

''ऐक!'' पिलर तिला म्हणाली, ''या पोरानं तुला पुष्कळ उचलून नेलं. त्या वेळी तुझे पाय बोलत नव्हते. गोळ्या काय त्या बोलक्या होत्या. तुला त्यानं तिथंच टाकली असती, तर तो केव्हाच गोळ्यांच्या माऱ्यातून पलीकडे गेला असता.''

''मी उपकार मानले आहेतच त्याचे,'' मेरिया म्हणाली, ''मीही त्याला तसाच कधीतरी नेईन. जरा मस्करी करू दे. त्यानं मला उचलून नेलं म्हणून दरवेळेला मी गहिवरून यायला नको. हवं का?''

''मी तुला खाली टाकली असती,'' जोकीन तिला चिडवीत म्हणाला,

''पण पिलरनं मला गोळीच घातली असती.''

''मी कुणाला गोळी घालीत नसते,'' पिलर म्हणाली.

''खरंच आहे ते,'' जोकीन म्हणाला, ''गोळी घालायची तुला गरजच नाही. तोंडानंच ते तू करतेस.''

''ही रीत का तुझी बोलण्याची?'' पिलर त्याला म्हणाली, ''किती चांगला मुलगा होतास तू! चळवळीआधी तू काय करीत होतास?''

''काहीच करीत नव्हतो,'' जोकीन म्हणाला, ''मी फक्त सोळा वर्षांचा होतो.''

''पण करीत काय होतास?''

''अधूनमधून बूटजोड करीत होतो.''

''बनवीत होतास?''

''नाही. पॉलीश करीत होतो.''

''काहीतरी दडवतोय तो,'' पिलर म्हणाली. तिनं त्याच्या तांबड्या तोंडाकडे, चपळ बांध्याकडे, केसांच्या झुलपांकडे नि चालण्याच्या त्याच्या ऐटीकडे पाहिलं. ''तुला ते का जमलं नाही?''

''ते काय?''

''ते काय! ते काय ते तुला ठाऊक आहे. आता मिशा फुटल्यात तुला.''

''मला वाटतं भयानं.''

''तू तसा बांधेसूद आहेस चांगला,'' पिलर म्हणाली, ''पण चेहऱ्यात दम नाही. भयानं झालं असं तर? हो ना? गाडीच्या वेळी तू ठीक होतास.''

''आता त्यांचं भय गेलंय माझं,'' तो म्हणाला, ''आता नाही उरलं. बैलांपेक्षा जास्त धोक्याच्या– कितीतरी जास्त वाईट गोष्टी आम्ही पाहिल्या आहेत. कोणताही बैल झाला तरी मशीनगनइतका धोकादायक नसतो. पण





# बाजिंद

**५वी आवृत्ती**

**लेखक : पै. गणेश मानुगडे**

पाखरांची बोली टिपणारा... स्वराज्यनिष्ठेचा प्रेरक...
आणि प्रखर योद्धा 'बाजिंद'...
रसिक वाचकांवर मोहिनी घालणारी रहस्यमय प्रेमकथा...

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज : ५०/- रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

आता मी जर बैलासमोर आखाड्यात उतरलो, तर पाय ताब्यात राहतीलच असा विश्वास नाही.''

''त्याला बुलफायटर व्हायचं होतं,'' पिलरनं स्पष्टीकरण केलं, ''पण तो भीत होता.''

''बैल आवडतात तुम्हाला, सुरुंगवाले?'' जोकीननं दात दाखवीत हसत विचारलं.

''अतिशय– अतिशय आवडतात,'' रॉबर्ट जॉर्डन म्हणाला.

''वालाडोविलमध्ये पाहिलेत तुम्ही?'' जोकीननं विचारलं.

''हो! सप्टेंबरात– फेरियाच्या वेळी.''

''माझंच गाव ते–'' जोकीन म्हणाला. ''काय गाव आहे! त्या लढाईत काय भोगावं लागलंय त्या चांगल्या लोकांना!'' त्याचा चेहरा गंभीर झाला. ''तिथंच त्यांनी गोळी घातली माझ्या आईला, माझ्या मेव्हण्याला नि आता माझ्या बहिणीला.''

''काय रानटीपणा!'' रॉबर्ट जॉर्डन म्हणाला.

असलं हे त्यानं किती वेळा ऐकलं होतं? शब्द फुटायला जड जात असतानाही लोकांना असं म्हणताना कितीदा त्यानं पाहिलं होतं? माझी आई, माझा बाप, माझी बहीण, माझा भाऊ असं म्हणताना कितीदा दाटलेला गळा नि भरलेले डोळे त्यानं पाहिले होते? आपल्या मृतांबद्दल त्यांना असं बोलताना आपण कितीदा ऐकलं असेल, तेही त्याला आठवत नव्हतं. गावाचं नाव निघताच तेही सगळे एकदम या मुलासारखंच म्हणाले होते. तेव्हा आपण म्हणालो होतो, काय रानटीपणा!

आपण फक्त गमावले त्यांच्या कहाण्या ऐकल्या. ओढ्याच्या काठावर सांगितलेल्या आपल्या हकिगतीत जसे फॅसिस्ट मेलेले जणू प्रत्यक्ष दाखवावे, तसे पिलरने सांगितले. तसा एखादा बाप मरताना आपण पाहिला नाही. कुठल्यातरी एका परसात, शेतात किंवा मळ्यात किंवा रात्रीचा एखाद्या रस्त्याच्या बाजूला ट्रकच्या दिव्याच्या उजेडात तो मेला, एवढंच आपल्याला कळलं. टेकड्यांवरून आपण ट्रकचा उजेड पाहिला, गोळीबार ऐकला. नंतर आपण खाली रस्त्यावर आलो नि मृतदेह आढळले. ती आई, बाप, बहीण प्रत्यक्ष गोळ्या घातलेली आपण पाहिली नाहीत. त्यांच्याबद्दल ऐकले, गोळीबार ऐकला.


पिलरनं ते सारं त्या गावाच्या गोष्टीत डोळ्यांपुढे दाखवलं.

या बाईला लिहिता वाचता येत असतं तर? ते लिहिण्याचा आपण यत्न करू, जर जगलो वाचलो नि आठवता आलं, तर तिनं सांगितलेलं तसं कागदावर आणू. बाप्पा! काय गोष्ट सांगते ती! क्यूवेदोहून ती सरस आहे, त्याच्या मनात आलं. एखाद्या डॉन फॅस्टिनोचं मरण तिनं सांगितलं तसं आपल्याला कधी लिहिता आलं नाही. तिची हकिकत उतरण्याइतकं चांगलं आपल्याला लिहिता येत असतं तर! आम्ही केलं ते, दुसऱ्यांनी आम्हाला केलं ते नाही. ते सगळं ठाऊक आहे. सरहद्दीच्या मागे ते घडलेलं पुष्कळ ठाऊक आहे. पण याआधी त्या लोकांशी परिचय हवा होता. खेड्यातलं त्यांचं जीवन माहीत असायला हवं होतं. शिवाय आमच्या हालचालीमुळे नंतर उलटा टोला खायला आम्हाला कधी तिथं राहावं लागलं नसल्यानं गोष्टींचे शेवट आम्हाला कधी कळलेच नाहीत. एखाद्या शेतकऱ्याकडे त्याच्या कुटुंबात तुम्ही राहिलात. रात्री आलात, त्यांच्याबरोबर जेवलात. दिवसा तुम्ही लपून राहिलात. सकाळी गेलातही. तुमचे काम करून तुम्ही निघून गेलात. दुसऱ्या खेपेला त्या बाजूला तुम्ही आल्यावर तुम्हाला कळतं की, सगळे गोळीबारात मेले. असं होत गेलं सगळं. साधंसरळ.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**७वी आवृत्ती**




# जेआरडी
## एक चतुरस्र माणूस


**किंमत : १७०/-रु. । पोस्टेज : ५०/- रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेले पहिले आणि
एकमेव उद्योगपती श्री. जेआरडी टाटा या
चतुरस्र व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे पुस्तक

# अभिप्राय



## यशस्वी व्यक्तीचा प्रभावी स्मृतिपट...




बिल गेट्‌सच्या जोडीने ‘मायक्रोसॉफ्ट’ कंपनीची स्थापना केलेले पॉल ॲलन यांनी लिहिलेल्या ‘आयडिया मॅन’ या मूळ इंग्रजी पुस्तकाचा त्याच नावाने मराठी अनुवाद नुकताच प्रकाशित झाला आहे. एका सामान्य अमेरिकी कुटुंबातल्या मुलाला पुढे जगाच्या इतिहासातल्या श्रीमंतांच्या पंक्तीत बसण्याचा मान मिळाला, त्याची कथा लेखकाने रंजकपणे मांडली आहे. आपल्या अंगभूत गुणांच्या जोरावर लेखकाने त्या काळचं चित्र कसं कायमचं पालटून टाकलं, त्याबद्दलची ही साध्या, सोप्या भाषेत सांगितलेली कथा वाचनीय झाली आहे. सॉफ्टवेअरशिवाय विमानोड्डाण आणि इतरही अनेक क्षेत्रांत लेखकाने मारलेल्या विजयी भराऱ्यांची, तसेच त्यांच्या आयुष्यातील बिकट प्रसंगांचीही ही कथा आहे. लेखकाच्या बुद्धिमत्तेची आणि औदार्याची झलक पुस्तकात जागोजागी जाणवत राहते.


*- दैनिक लोकमत, २१-४-२०१९*

**आयडिया मॅन** लेखक **: पॉल ॲलन** । अनु. **: स्वाती देशपांडे**
पृष्ठे : **४३२** । मूल्य : **४९५/-रु.**

---

## समुद्रसफरीतील रंजक कादंबरी...

एकोणिसाव्या शतकातील न्यू यॉर्क येथील प्रसिद्ध लेखक आणि तनमनाने दर्यावर्दी असलेले हर्मन मेलव्हिल यांनी १८४१मध्ये अमेरिकेतील दक्षिणी समुद्राची सफर केली. या सफरीच्या दुसऱ्या वर्षात ते पॉलिनेशियन बेटांवर पोहोचले. या बेटांवरील टैपी या आदिवासी जमातीबरोबर त्यांनी



काही काळ घालवला. या विलक्षण अनुभवांवर आधारित असलेली 'टैपी' ही कादंबरी त्यांनी त्यानंतर पाच वर्षांनी लिहिली. तिचा मराठी अनुवाद आता 'पाचूचे बेट' या नावाने नुकताच प्रकाशित झाला आहे. टैपी लोकांबरोबर घालवलेले चार महिने आणि सुटकेसाठी केलेले प्रयत्न याचे रोमहर्षक वर्णन असलेल्या या कादंबरीत लेखकाच्या साहसी मनाचे आणि प्रवाही तत्त्वचिंतनाचे छान प्रतिबिंब पडले आहे. लेखकाची कथनशैली वाचकाला बांधून ठेवते.

*- दैनिक लोकमत, ५-५-२०१९*

**पाचूचे बेट** लेखक:**हर्मन मेलव्हिल** । अनु.: **भानू शिरधनकर**

पृष्ठे : **१९२** । मूल्य : **२४०/-रु.**

---

## लहानांसाठी गोष्टीरूप बोधकथा




निसर्गातल्या साध्या साध्या गोष्टींकडे लहान मुलांच्या कुतूहल बुद्धीने पाहिले तर त्या अधिक सुंदर दिसतात आणि त्यांच्याच भाषेत त्या मांडल्या तर बालवाचकांना मनापासून वाचायला आवडतात. याच नजरेतून मेहता पब्लिशिंग हाऊसने लहानांसाठी छोटेखानी पुस्तकांची मालिका प्रकाशित केली आहे. त्यातीलच एक चार पुस्तकांचा संच ज्ञानदा नाईक यांनी लिहिला आहे. यात सोनूचा धडा आणि इतर बोधकथा, प्रचंड भोपळ्यातला राक्षस आणि इतर बोधकथा, तळ्याकाठची मैत्री आणि इतर बोधकथा, यक्षाचे ढोलके आणि इतर बोधकथा यांचा या संचात समावेश आहे. आपल्या स्वाभाविक प्रेरणांनी जगणाऱ्या प्राणी, पक्ष्यांचं निसर्गाशी असलेलं नातं अधोरेखित करताना या पुस्तकांतून त्यांच्या जगण्याशी मानवाच्या कृतीची सांगड घालून निसर्गसंवर्धनावर प्रकाश टाकला आहे.

*- लोकमत, २ जून २०१९*

**गोष्ट डॉट कॉम - लेखिका : ज्ञानदा नाईक**

(चार पुस्तकांचा एकत्रित संच) मूल्य : **२८०/-रु.**

## चैतन्यदायी ‘फिश’...




स्टिफन सी. लन्डिन, जॉन क्रिस्टेन्सेन आणि हॅरी पॉल यांच्या मूळ इंग्रजी ‘फिश’ या कथेचा डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके यांनी ‘फिश’ हा मराठी अनुवाद केला आहे. ‘फिश’ ही संपूर्ण काल्पनिक कथा असून, नोकरी, व्यवसायात व्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरली आहे. ही कथा सिॲटलमध्ये घडते आणि या कथेची नायिका आहे जेन रेमिरेझ. या कथानकातले घटनाचक्र अत्यंत प्रवाही असून त्यावर आधारित व्हिडिओ फिल्मही प्रसिद्ध आहे.

जेनवर नवऱ्याच्या मृत्यूमुळे आकस्मिक आपत्ती कोसळते आणि आर्थिक तंगी असताना नोकरीतही अशक्य आव्हाने समोर उभी ठाकतात. या सगळ्याचा सामना जेन कसा करते त्याची कथा आहे ‘फिश’. आपले नशीब आपल्या हातात नसते. पुढे काय परिस्थिती येईल तेही कोणी सांगू शकत नाही; पण आलेल्या परिस्थितीला कसे तोंड द्यायचे हे आपण ठरवू शकतो. आपल्या आवडीचे काम निवडणे हे नेहमीच आपल्या हातात नसते; पण हातातले काम आवडीने करणे हे आपल्याच हातात असते. तिसऱ्या मजल्यावरच्या विषारी ऊर्जेच्या कचरा डेपोचा निचरा कसा करावा ही जेनला भेडसावणारी समस्या तुम्हाआम्हालाही अनेकदा त्रस्त करते; कारण कोणतेही काम सतत करीत राहण्याचा आपल्याला कंटाळा येतो. जेन ऑफिसमधल्या सर्वांचे अजून फक्त निरीक्षण करून काही नोंदी करून घेते आणि मग एक दिवस जगप्रसिद्ध पाइक प्लेस फिश मार्केटला अपघाताने पोहोचते. या फिश मार्केटच्या भेटीनंतर तिसऱ्या मजल्यावर कोणती जादू घडते हे वाचणे आणि अनुभवणे फार आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी आनंदी आणि उत्साही वातावरण असेल, आपले काम जीव ओतून करण्याची तळमळ असेल, दुसऱ्याला सौख्य लाभू देण्याची वृत्ती असेल तर कशी मनोवृत्ती निवडावी हे ‘फिश’मधून आवश्य जाणून घ्यावे.

*-**नमिता श्रीकांत दामले,** (दैनिक सामना – २१-७-२०१९)*

**फिश!** - लेखक : **स्टिफन सी. लन्डिन, जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल** अनु. : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके । पृष्ठे : **१०४** । मूल्य : **१४०/-रु.**

◆

# बालनगरी



(‘मोठ्यांच्या छोट्या गोष्टी’ या पुस्तकातून)
लेखक : माधव मोर्डेकर

## लोकमान्य टिळक



*लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे नाव निघाले रे निघाले की पाठोपाठ येते त्यांची सिंहगर्जना– ‘स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच...!’ देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या थोर देशभक्तांनी रात्रंदिवस आपले आयुष्य वेचले त्यामध्ये लोकमान्य टिळक आघाडीवर होते. अशा थोर पुरुषांची आठवण ठेवणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्यच आहे. टिळकांच्या नावापुढे चिकटलेला ‘लोकमान्य’ हा शब्द त्यांच्या नावाचाच एक भाग वाटावा इतका पक्का रुजला आहे. अशा महापुरुषांची थोरवी हीच असते. राजकारणाच्या जोडीने टिळकांनी समाजाला तत्त्वज्ञानाचेही धडे दिले. त्यांचा ‘गीतारहस्य’ हा ग्रंथ अलौकिक ठरला. टिळकांची पत्रकारिताही तशीच तेजस्वी होती. त्यांच्या ‘केसरी’ने ब्रिटिशांना सतत भयभीत केले. टिळकांची बुद्धिमत्ता अफाट होती. भारताचे भाग्य म्हणून ती बुद्धिमत्ता राष्ट्रकार्यासाठी खर्च पडली!*



शाळेत असल्यापासूनच टिळक चलाख, चुणचुणीत आणि चाणाक्ष होते. त्यांचा आत्मविश्वास जबरदस्त होता. वर्गात शिक्षक इतिहासाचा पाठ घेत होते. मुले पाठाची टिपणे वहीवर उतरून घेत होती. वर्गाबाहेर कसलातरी गलबला चालू होता. तिकडे मुलांचे लक्ष अधूनमधून जात होते. शिक्षकांनी वर्गावर नजर टाकली. एक मुलगा शांतपणे ऐकत होता. त्याने वही उघडलेली नव्हती. शिक्षकांना त्याचा राग आला. त्यांनी त्याला उभे केले. 'तू का लिहून नाही घेत? कशाला बसलाय्स वर्गात?'

टिळक शांतपणे उठून उत्तरले– 'सर, माझं पूर्ण लक्ष तुमच्या शब्दांकडे आहे. तुमचा शब्द न् शब्द माझ्या डोक्यात पक्का बसत असताना तो पुन्हा लिहून घ्यायची गरज मला वाटत नाही!' 'अस्सं, मग दाखव म्हणून, चुकलास की फोडून काढीन. लक्षात ठेव...!' शिक्षकांनी दिलेले आव्हान स्वीकारून टिळकांनी धडाधड म्हणून दाखवला सगळा पाठ! याला म्हणतात आत्मविश्वास!

***

# स्वातंत्र्यवीर सावरकर

*लोकमान्यांप्रमाणे विनायक दामोदर सावरकरांच्या नावामागे चिकटलेला 'स्वातंत्र्यवीर' हा शब्द त्यांना पुरा शोभतो. अक्षरश: तळहातावर प्राण घेऊन त्यांनी समुद्रात उडी घेतली. अंदमानच्या काळ्या पाण्यावर यशस्वी मात केली. क्रांतिकारकांच्या मेरूमण्यांत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. राजकारणाबरोबर समाजकार्याचीही हिरिरीने, निष्ठेने पाठ धरली. इतकेच नाही तर एक थोर प्रतिभाशाली साहित्यिक म्हणूनही मराठी साहित्यात 'जयोस्तुते, श्री महन्मंगले...' या स्वातंत्र्यदेवीच्या आळवणीला अमरत्व मिळवून दिले.*

सावरकर या नावाची ब्रिटिशांना नेहमी धास्ती वाटत होती. त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याच्या हेतूने सरकारने सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावून अंदमानसारख्या निर्जन, रोगराईग्रस्त बेटावरील तुरुंगात पाठवले. एक, दोन नव्हे मोजून ४० वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी. सावरकर तुरुंगाच्या दारात ठाकले. गळ्यात पाटी अडकवलेली– चाळीस वर्षे तुरुंगवास! जेलरने कुत्सितपणाने प्रश्न केला– 'चाळीस वर्षे पुरी करण्याइतकी हिंमत आहे काय?'

सावरकरांनी त्याच तडफेने प्रत्युत्तर दिले– 'का नाही? चाळीसच काय पण त्यापेक्षाही अधिक काळ जिवंत राहणार आहे मी! मात्र माझ्या याच जीवितकालात तुमच्या ब्रिटिश राजवटीला मात्र अखेरची घटका मोजायची पाळी येणार आहे हे नीट समजून घ्या!'

सावरकरांचे सौभाग्य हे की तो स्वातंत्र्यसूर्य १५ ऑगस्ट १९४७ रोजी आकाशात अवतरलेला पाहताना त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरभरून वाहत होते.

***




**मेहता पब्लिशिंग हाऊस** आयोजित कार्यक्रमात **'उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी' या पुस्तकाचं अभिवाचन** करताना **ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. अरविंद वामन कुळकर्णी** यांचे **सुपुत्र आणि अभिनेते अभय कुळकर्णी**. याच कार्यक्रमात **'शांतता! कोर्ट चालू आहे'** या नाटकातील काही भागाचं सादरीकरण करताना **आदिश्री बडोदकट आणि तेजस इंदापूरकर.** (सविस्तर वृत्त पान १८वर)




**मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'बेटर'** आणि **'स्वर्गाचा साक्षात्कार'** या दोन पुस्तकांचं नुकतंच प्रकाशन करण्यात आलं. हा प्रकाशन समारंभ एस. पी. कॉलेजमध्ये पार पडला. या प्रसंगी (डावीकडून) **एस. पी. कॉलेजच्या मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अरविंद काकुळते, प्राचार्य डॉ. दिलीप शेठ, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. संजय देवधर, अनुवादक सुनीति काणे आणि मेधा मराठे, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या प्रॉडक्शन विभागाच्या प्रमुख राजश्री देशमुख.** (सविस्तर वृत्त पान १८वर)

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/08/2019 Posting Date : 11/08/2019


# आवर्जून वाचावे















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,